१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

• मुंबई, सोमवार ६ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२३, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 123 Marathi - Daily - Mumbai, 6 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

मविआ पुन्हा फुटणार?

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# मानखुर्दमध्ये चाळीचा भाग कोसळून ६ ठार

## झाडे पडून आणखी दोन जणांचा मृत्यू

■ मुंबई



**मुंबईत आज दुर्घटनांची मालिकाच सुरू होती. मानखुर्दच्या जनता नगरात आज रात्री निर्माणधीन तीन मजली चाळीचा भाग कोसळून ६ जणांचा मृत्यू झाला. तर आज सकाळी चेंबूर येथे शाळेच्या बसवर झाड कोसळून एका ११ वर्षांच्या विद्यार्थ्याचा बळी गेल्यावर आरे कॉलनी आणि कुर्ला येथील झाडे पडण्याच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये आणखी दोघा मुंबईकरांचा मृत्यू झाला. त्यामुळे मुंबई परिसरात पावसाशी संबंधित मृतांचा आकडा दहावर पोहोचला आहे. यातील तीन घटना झाडे पडण्याच्या आहेत. त्यामुळे महापालिकेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला असून, आणखी किती बळी गेल्यावर पालिकेला जाग येणार आहे, असा संतप्त सवाल मुंबईकर विचारत आहेत.**

**मुसळधार** पाऊस कोसळत असताना आज रात्री साडेनऊ वाजता मानखुर्दच्या जनता नगरात निर्माणधीन तीन मजली चाळीचे बांधकाम कोसळले. हे बांधकाम शेजारील दोन घरांवर पडले. त्यामुळे या घरातील एकूण ७ जण ढिगाऱ्याखाली दबले गेले. त्यातील ६ जणांना जखमी अवस्थेत बाहेर काढून शताब्दी रुग्णालयात आणि घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. एकाला रात्री उशिरापर्यंत ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्याचे अग्निशमन जवानांचे काम सुरू होते.

कुर्ला (पश्चिम) येथील कमानी परिसरातील गोम्स गाऊन बिल्डिंग पालिका शाळेजवळ दुपारी १२.४० वाजण्याच्या सुमारास दुपारी मोठे झाड एका दुकानावर कोसळले. या दुर्घटनेत दुकानात असलेले ६३ वर्षीय युनूस कुंदावाला गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर चार तास उलटूनही महापालिका प्रशासन आणि संबंधित अधिकारी घटनास्थळी न आल्याचा आरोप करत मनसे कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. महापौर रितू तावडे घटनास्थळी येईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला. मुंबईकरांनी नेमके खाली पाहून चालायचे की वर पाहून? वर पाहिले नाही तर झाड कोसळण्याची भीती आणि खाली पाहिले नाही तर उघड्या मॅनहोलमध्ये पडण्याचा धोका. नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबवण्यासाठी प्रशासनाने उत्तर द्यावे, असा संतप्त सवाल मनसेने उपस्थित केला. नंतर या आंदोलनात उबाठा नगरसेविका किशोरी पेडणेकर यांनीही सहभाग घेतला. या आंदोलनावेळी मनसे नेते म्हणाले की, पान ७ वर

### १२,७०० कोटींच्या कोस्टल रोडवर पाणीगळती

महागड्या आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या मुंबई कोस्टल रोडवर पाणीगळती झाली. संबंधित यंत्रणांनी याची दखल घेत घटनास्थळी तांत्रिक पथक रवाना करून तातडीने दुरुस्तीचे काम केले. मात्र, कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या या प्रकल्पात अशा प्रकारची गळती आढळल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. मुंबई कोस्टल रोड प्रकल्पावर सुमारे १२,७०० कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. दक्षिण कोस्टल रोड सुमारे १० किलोमीटरचा असून, तो मरिन ड्राईव्ह (प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर) ते वरळी-बांद्रा सी-लिंकपर्यंत विस्तारित आहे. या घटनेनंतर प्रकल्पाच्या गुणवत्ता, देखरेख आणि कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## मंदिर लुटणाऱ्यांना माफी नको

### उद्धव ठाकरेंचे रामरक्षा आंदोलन



■ मुंबई

**अयोध्येतील** राम मंदिराच्या दानपेटीत झालेल्या चोरी आणि निधी अपहाराच्या मुद्यावरून उद्धव ठाकरेंचा उबाठा पक्ष कमालीचा आक्रमक बनला आहे. या चोरीचा निषेध नोंदवण्यासाठी उबाठाच्या वतीने आज दादर येथील हनुमान मंदिरात 'रामरक्षा आंदोलन' करण्यात आले. भरपावसात झालेल्या या आंदोलनावेळी उद्धव ठाकरेंनी आवाहन केले की, राम मंदिर लुटणाऱ्यांना माफ करू नका. जागे राहा. या प्रकरणाची चौकशी होऊन निकाल लागत नाही, तोपर्यंत स्वस्थ बसू नका.

या आंदोलनाला उबाठाचे खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, अनिल देसाई, आदित्य ठाकरे, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, सुभाष देसाई, चंद्रकांत खैरे उपस्थित होते. पान २ वर

### जेमतेम गर्दी

उबाठाने आज काढलेल्या आंदोलनाला फारशी गर्दी नव्हती. जेमतेम हजारेक उबाठा समर्थकही या आंदोलनाला उपस्थित नव्हते. त्यामुळे उबाठाचे रामरक्षा आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून आले.

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी इ. विकारांवर असरदार !
संपर्क - डॉ. अभिजीत (आयुर्वेदाचार्य)
9422011723
www.dhoutiyog.co.in

# 'हाफकीन' महामंडळाचे खासगीकरण करणार

## ७५ एकर जागेवर डोळा! कोट्यवधीचे कल्चरही विकले?

■ मुंबई



**सर्पदंश,** पोलिओ, खोकला, ॲण्टी रेबिज अशा असंख्य जीवघेण्या आजारांवर गेले शतकभर प्रभावी लसींचे संशोधन व उत्पादन करणाऱ्या हाफकीन महामंडळाचे खासगीकरण केले जाणार आहे. खासगी संस्था आणि महामंडळ यांची पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप हे त्याचे पहिले पाऊल महामंडळाने टाकले आहे. यासाठी स्वारस्य अर्ज मागविले तेव्हा केवळ रिलायन्स लाईफ सायन्सने अर्ज केला. हा एकच अर्ज आल्याने कायद्यानुसार तो स्वीकारता येत नाही म्हणून पुन्हा भागीदारीसाठी अर्ज मागविले जाणार आहेत. पण खासगी कंपनीसोबत करार होणारच, दुसरा पर्याय नाही असे खुद्द अन्न व औषध प्रशासक मंत्री नरहरी झिरवळ यांनी अधिवेशनातच सांगितले. हे खासगीकरण झाले तर हाफकीनच्या लसीवरील अधिकार आणि हाफकीनची ७५ एकर जागा या दोन्हीशी भयानक तडजोड होणार आहे.

हाफकीनला ११०० कोटी रुपयांची आर्थिक मदत करून ॲण्टी रेबीज, पंचगुणी लस, फॅक्टर ८ व ९, पोलिओ इंजेक्शन याची उत्पादने घेण्यास मदत करा, असा अहवाल २०१७ साली दिला होता. पण प्रशासनाने त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. हाफकीन तोट्यात यावे यासाठी प्रशासनानेच नियोजनपूर्वक निधी अडवला. ज्या अधिकाऱ्यांनी हाफकीन लुटले त्यांच्यावर कारवाई केली नाही. आता हे महामंडळ तोट्यात आणून खासगी उद्योगाशी करार करणार, असे मंत्री उघडपणे सांगतात. पण हाफकीनला निधी दिला तर हे महामंडळ लस उत्पादन करून फायद्यात येईल आणि शासनाने दिलेला निधी परत करील इतकी हाफकीनची ताकद आहे. मात्र मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिराला ४५० कोटी निधी गरज नसताना देणारे सरकार हाफकीनला मदत करायला तयार नाही.

हाफकीनच्या ७५ एकर जमिनीपैकी एक इंचही जमीन विकू देणार नाही असे मंत्री नरहरी झिरवळ म्हणताच विजय वडेट्टीवार म्हणाले की, हाफकीनची ५ एकर जागा यापूर्वीच तुम्ही टाटाला दिली आहे. त्यामुळे एकही इंच देणार नाही असे म्हणू नका. टाटाला कर्करोगावरील उपायाच्या संशोधनासाठी प्रयोगशाळा पान ७ वर

## टीसीएस धर्मांतर प्रकरणात तिघांचे जामीन अर्ज फेटाळले

**नाशिक** - नाशिकमधील टीसीएस धर्मांतर प्रकरणात आरोपी रजा मेमन, शाहरुख कुरेशी आणि अश्विनी चेनाने यांचे जामीन अर्ज नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळले आहेत. यापूर्वीही कनिष्ठ न्यायालयाने या तिन्ही आरोपींचे जामीन अर्ज नामंजूर केले होते.

जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश अमित खारकर यांनी आरोपांचे स्वरूप, प्रकरणाचे गांभीर्य आणि सुरू असलेला तपास लक्षात घेऊन हा निर्णय दिला. संशयितांना जामीन मंजूर झाल्यास ते पुराव्यांशी छेडछाड करू शकतात. तसेच संबंधित साक्षीदार किंवा पीडितांवर दबाव टाकण्याची शक्यता असल्याचा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला होता. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत जामीन अर्ज फेटाळले. या प्रकरणात टीसीएस कंपनीतील तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचा तसेच नाव बदलून तिला परदेशात पाठविण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. या संदर्भात देवळाली कॅम्प आणि मुंबई नाका पोलीस ठाण्यांत विविध कलमांखाली नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## लोककलेचा बुलंद आवाज हरपला

### पद्मविभूषण तीजन बाई यांचे निधन

■ रायपूर

**भारतीय** लोककला विश्वातील पंडवानी गायनाला जागतिक ओळख मिळवून



देणाऱ्या प्रख्यात लोककलावंत आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या डॉ. तीजन बाई (७०) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. रायपूर येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान आज पहाटे सुमारे ३ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दमदार आवाज, प्रभावी अभिनय आणि वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरणातून त्यांनी पंडवानी कलेला देशासह जगभर नवी ओळख मिळवून दिली. त्यांच्या निधनाने भारतीय लोककला आणि सांस्कृतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

२४ एप्रिल १९५६ रोजी छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील गनियारी गावात पारधी समाजात त्यांचा जन्म झाला. लहानपणी आजोबा ब्रजलाल पारधी यांच्याकडून महाभारताच्या कथा ऐकत असताना त्यांना पंडवानीची पान २ वर

## जागतिक पासपोर्ट निर्देशांकात भारताची १२५ व्या स्थानी घसरण

■ नवी दिल्ली

**जागतिक** पासपोर्ट निर्देशांकात भारतीय पासपोर्ट एका स्थानाने घसरून १२५ व्या स्थानी पोहोचला आहे. ग्लोबल सिटीझन सोल्युशन (जीसीएस) या संस्थेने जाहीर केलेल्या २०२५ साठीच्या अहवालातून ही बाब समोर आली आहे. २०२४ मध्ये भारतीय पासपोर्ट १२४ व्या स्थानी होता. २०२५ मध्ये त्यात एका स्थानाची घसरण झाली. आश्चर्याची बाब म्हणजे भारतीय पासपोर्टपेक्षा नामिबिया हा आफ्रिकन देश एक स्थानाने सरस म्हणजेच १२४ व्या स्थानी पोहोचला आहे. तर अझरबैजान हा देश भारताच्या एक पायरी खाली म्हणजेच १२६ व्या स्थानी आहे. जागतिक पासपोर्टची क्रमवारी ठरवणाऱ्या बहुतांश संस्था व्हिसामुक्त प्रवास या मुद्याला सर्वाधिक महत्त्व देतात. मात्र जीसीएस ही संस्था संबंधित देशाला पसंती देणाऱ्या जागतिक पर्यटकांची संख्या, देशातील गुंतवणुकीच्या संधी आणि सर्वसामान्य जीवनमान या मुद्यांचा विचार करून क्रमवारी ठरवते.

## ९,२८० कोटींचे बँक फसवणूक प्रकरण 'रिलायन्स'चे बाफना सीबीआयच्या ताब्यात

■ मुंबई

**अनिल** अंबानी समूह यांच्या रिलायन्स कॅपिटल लिमिटेड संदर्भातील ९,२८० कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात सीबीआयने काल कंपनीचे माजी सीएफओ म्हणजेच मुख्य वित्तीय अधिकारी अमित बाफना यांना अटक केली. ईडीच्या एका प्रकरणात दिल्लीतील तिहार कारागृहात असलेल्या बाफना यांना प्रॉडक्शन वॉरंटवर मुंबईत आणण्यात आले. त्यानंतर त्यांना विशेष सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना ७ जुलैपर्यंत सीबीआय कोठडी सुनावली आहे.

सीबीआयच्या म्हणण्यानुसार, ऑगस्ट २०१४ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत रिलायन्स कॅपिटलचे सीएफओ असलेल्या बाफना यांची कंपनीच्या आर्थिक व्यवहारांवर देखरेख होती. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी घातलेल्या कर्जाच्या अटींचे उल्लंघन होत असल्याची माहिती असूनही त्यांनी मध्यस्थ आणि 'कंड्युट' कंपन्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेडने घेतलेली कर्ज मध्यस्थ कंपन्यांमार्फत रिलायन्स एडीए समूहातील रिलायन्स कॅपिटल लिमिटेड, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि रिलायन्स पॉवर लिमिटेड यांसारख्या कंपन्यांकडे वळविण्यात आली.

## राममंदिर प्रकरणी प्रियांका गांधींचा जबाब नोंदवा! विहिंपची मागणी

■ अयोध्या

**राम जन्मभूमी** मंदिरातील देणगी गैरव्यवहार प्रकरणात आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा आणि इतर विरोधी पक्षांच्या नेत्यांचे जबाब नोंदवावेत, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने अयोध्या पोलिसांकडे केली आहे.

विहिंपचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आलोक कुमार तिवारी यांनी तपास अधिकारी तथा उपपोलीस अधीक्षक आशुतोष तिवारी यांना पत्र पाठवून संबंधित नेत्यांना समन्स बजावण्याची मागणी केली आहे. त्यांनी केलेल्या आरोपांचा आधार, माहितीचा स्त्रोत आणि त्यासंदर्भातील पुरावे तपास यंत्रणेकडे सादर करण्यास सांगावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. पत्रानुसार, अरविंद केजरीवाल यांनी राम मंदिरातून सुमारे २०० कोटी रुपयांची रोकड, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू चोरीला गेल्याचा आरोप केला होता. तसेच या प्रकरणात निष्पक्ष चौकशी झाल्यास सरकार अडचणीत येईल, असेही त्यांनी म्हटल्याचा दावा विहिंपने केला आहे. समाजवादी पक्षाचे नेते रामगोपाल यादव पान ७ वर

## दानिश रुग्णालयात..

**दानिश म्हणजे बुद्धी, विवेक, ज्ञान, विद्या. अशाच एका दानिश अली नावाच्या सावित्रीच्या लेकीचा आज उपोषणाचा सातवा दिवस आहे. जेएनयूएसयूची दानिश अली जॉईंट सेक्रेटरी असून, तिला उपोषणादरम्यान गंभीर प्रकृतीमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले.**



**दानिशने** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा सातवा दिवस गाठल्यानंतर तिला डॉ. राम मनोहर लोहिया हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांची रक्तातील साखरेची पातळी जीवघेण्या पातळीपर्यंत घसरल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात नेऊन आयव्हीतून द्रव देण्यात आले.

जंतर-मंतर येथे ती नीट परीक्षेच्या प्रश्नावर बोलत होती.

तिने जवाहरलाल नेहरू विद्यापीठामधील ग्रंथालयातील जर्नल्स आणि पुस्तकांसाठीच्या अपुऱ्या निधीकडेही लोकांचे लक्ष वेधले. हीच परिस्थिती देशभरातील अनेक विद्यापीठांमध्ये असल्याचेही तिने लक्षात आणून दिले.

एम.ए. आणि पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे दोन हजार आणि आठ हजार रुपयांची शिष्यवृत्ती अत्यंत अपुरी असल्याचे तिने नमूद केले. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांना या देशात दहशतवादी म्हटले जाते. खरे सांगायचे तर स्ट्रेचरवर दानिश नव्हे, तर देशाची लोकशाही पडलेली दिसत आहे. जंतर-मंतर येथे २० हून अधिक आंदोलक अजूनही बेमुदत उपोषणावर असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तत्काळ राजीनाम्याची मागणी करत आहेत.

धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावाच.

एक इंचही मागे हटणार नाही. कॉम्रेड दानिश अली यांना लाल सलाम.

**लीना पांढरे**

## नातवाच्या मृत्यूचा धक्का असह्य केतन अगरवालच्या आजोबांचे निधन

■ पुणे

**लोहगड** किल्ल्यावरून ढकलून दिल्याच्या हत्या प्रकरणात मृत्यू झालेल्या केतन अग्रवालच्या कुटुंबावर पुन्हा दुःखाचा डोंगर कोसळला. नातवाच्या मृत्यूच्या धक्क्यातून सावरू न शकलेले त्याचे आजोबा देवीचंद अग्रवाल (७१) यांचे रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यामुळे अग्रवाल कुटुंबावर अल्पावधीतच दुसऱ्यांदा शोककळा पसरली. त्यांच्यावर निगडी येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले.

केतनच्या मृत्यूनंतर त्याचे आजोबा देवीचंद अग्रवाल यांना मोठा मानसिक धक्का बसला होता. काही काळापूर्वी त्यांच्यावर हृदयाची शस्त्रक्रिया झाली होती आणि ते आधीपासूनच विविध आजारांनी त्रस्त होते. नातवाच्या मृत्यूनंतर त्यांची प्रकृती अधिकच खालावली. काही दिवसांपूर्वी त्यांना पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

बाइंडिंगसाठी कारागीर आणि हेल्पर मुले आणि मुली पाहिजे कटींग मशीन ऑपरेटर पाहिजे भिवंडीसाठी हवे आहेत कैलाश गुप्ता- **7977660618** {NC261124}

ऑफिस असिस्टंट पाहिजे राहण्याची आणि जेवण्याची सोय केली जाईल फोन **8421670520** {NC261106}

भांडुपमध्ये तिरुपती कुरीयरसाठी डिलीव्हरी बॉयज आणि ऑफिससाठी मुलगी पाहिजे. **-08320458944.** {NC261129}

ऑफसेट प्रिंटर पाहिजे (हाइडेलबर्ग २-कलर/ 28x40/ सीडी, सीपी ट्रॉनिक मशीन), स्थानः कांदिवली **+917506719548** {NC261054}

पाहिजेत, ऑफसेट प्रिंटर, फिडरमन, बॉयलर, फोनः **9822067665** उल्हासनगर, कल्याण {NC261086}

मुंबईमधील नामांकित कॉन्ट्रॅक्टरला फक्त मुंबईतील साईट करताच. इलेक्ट्रिशन, वायरमन व हेल्पर त्वरित पाहिजेत. पगार व गाडी भाडे दिले जाईल. संपर्क - **9819178977** {NC261075}

कल्याण (कोणगाव) येथील प्रिंटिंग प्रेसमध्ये आवश्यकता आहे. स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर, लेमिनेशन मशीन ऑपरेटर, ऑफसेट मशीन ऑपरेटर (SM-74), हेल्पर, फ्रेशर आणि पॅकींग स्टाफ. कल्याण स्टेशनवरून पिकअप आणि ड्रॉप उपलब्ध आहे. संपर्क- **8652636907/ 9821434502** {NC261098}

## पाहिजेत

कांदिवली वेस्ट ईमिटेशन ज्वेलरी पॅकिंग, स्टीकिंग स्टोन करिता लेडीज पाहिजेत. पगार 350 ते 450 प्रतिदिन. **-9619148488**. {NC261137}

२ कलर प्रिंटर, फिडरमन, कटींग बाईंडर, पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. लोअर परेल **9833552423** {NC261150}

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई. दररोज रोख ८००/- + प्रवास खर्च. SPEEDMAN EXPRESS 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai- 400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NC261127}

वसई/ मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले/ मुली पाहिजेत प. 18000/- : **9833730360** {NC261134}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाईसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्कः **9920925129** {NC261132}

प्लास्टिक मोल्डिंग ऑपरेटर आणि हेल्पर पाहिजेत. भेटा गाळा नं. B-1 ठाकूर कंपाऊंड फिल्टर पाडा पवई संपर्क- **9920458088** राहण्याची उत्तम सोय {NC261160}

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/ 24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC261090}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC261156}

## व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC261089}


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतः च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

# उ. प्रदेशात काँग्रेस समाजवादीचा 'धाकटा भाऊ' होणार नाही

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशमध्ये २०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने समाजवादी पक्षाचा 'धाकटा भाऊ' (ज्युनिअर पार्टनर) म्हणून भूमिका स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला आहे. काँग्रेसने राष्ट्रीय पक्ष असल्याची भूमिका मांडत समाजवादी पक्षाकडे समान अटींवर आणि सन्मानजनक समान जागावाटपाची मागणी केली आहे.

उत्तर प्रदेश काँग्रेसचे नवनियुक्त प्रभारी राजेंद्र पाल गौतम यांनी स्पष्ट केले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' आघाडीच्या यशात काँग्रेसने मोठी भूमिका बजावली होती. आगामी विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला सन्मानजनक वाटा मिळायला हवा. २०२७ च्या निवडणुकीत काँग्रेस १५० ते १७० जागांवर दावा करत असल्याची माहिती आहे, तर समाजवादी पक्ष काँग्रेसला मर्यादित (६०-८०) जागा देण्याच्या विचारात आहे. जागावाटपावरून वाढत्या तणावामुळे उत्तर प्रदेशातील आगामी पोटनिवडणुकांमध्येही दोन्ही पक्षांमध्ये मतभेद समोर आले आहेत. दलित, मुस्लीम आणि ब्राह्मण मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेस विशिष्ट नेत्यांचा वापर करत आहे, त्याचबरोबर बहुजन समाज पक्षासाठीही त्यांनी आपले दरवाजे खुले ठेवले आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, निवडणुकीच्या रिंगणात कोणताही प्रभाव नसलेला पक्षही आपली प्रतिमा पुसून टाकण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे.

# आसामच्या तिनसुकियामध्ये जपानच्या प्रसिद्ध 'माचा'चहाचे उत्पादन

■ गुवाहाटी

**आसाममधील** तिनसुकिया येथील 'छोटा टिंगराई टी इस्टेट'ने जपानी लोकप्रिय 'माचा'चहा उत्पादित करून देशाच्या पेय उद्योगात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी एक्सवर या कामगिरीची घोषणा केली. त्यांनी नमूद केले की, या उपक्रमामुळे 'ब्रँड आसाम टी'ची जागतिक प्रतिष्ठा अधिक बळकट होईल आणि भारत-जपान यांच्यातील दृढ संबंधांचे प्रतिबिंब यात दिसून येईल.

गुवाहाटी येथे झालेल्या या चहाच्या लिलावामध्ये एका लॉटची तीन हजार रुपयांना विक्री करण्यात आली. या चहाच्या मळ्याचे संचालक मृत्युंजय जालान यांनी सांगितले की, 'हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी गेल्या दशकभरापासून जपानी चहा उत्पादक,




कृषी संशोधक, उपकरण पुरवठादार आणि चहा अभ्यासक एकत्र काम करत होते. छोटा तिंगराईने आसामच्या पारंपरिक चहाचा वारसा आणि जपानचे अस्सल कौशल्य यांचा मेळ घातला आहे.'

# कार्ड, आधार, मतदार यादीत नाव तरीही कोर्टाने परदेशी नागरिक ठरवले

■ गुवाहाटी

**नागरिकत्वासंबंधीचे** अत्यंत दुर्मीळ उदाहरण आसाममधून समोर आले आहे. येथे एका मुस्लीम व्यक्तिकडे पॅनकार्ड, आधार कार्ड, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणीमध्ये (एनआरसी) त्याचे नाव आहे. एवढेच नव्हे तर आपण या देशातलेच आहोत हे दाखवून देणारे एकूण १५ कागदोपत्री पुरावे आहेत. असे असूनही गुवाहाटी उच्च न्यायालयाने त्याला परदेशी नागरिक ठरवले आहे.

अमिनुल हक असे या व्यक्तिचे नाव

**आसामच्या अमिनुल हकची व्यथा**

आहे. २०१९ मधील परदेशी नागरिक लवादाने त्यांना परदेशी नागरिक घोषित केले होते. लवादाच्या या निर्णयाला अमिनुल हक यांनी गुवाहाटी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. कल्याण राय सुराणा आणि न्या. शमिमा जहान यांच्या खंडपीठासमोर नुकतीच त्यांच्या याचिकेवर सुनावणी झाली असता खंडपीठाने त्यांची याचिका फेटाळून लावली. हक सांगतात की, ते जन्माने भारतीय आहेत. त्यांचे वाडवडील २४ मार्च १९७१ च्या आधीपासून भारतात वास्तव्यास होते. याचे १५ कागदोपत्री पुरावे त्यांनी न्यायालयात सादर केले आहेत. त्यामध्ये १९५१ ती राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी, १९६६ पासून मतदार यादीत नाव, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र आणि शाळांमधील नोंदी आदिंचा समावेश आहे. मात्र तरीही परदेशी नागरिक अधिनियमाच्या कलम ९ अन्वये आपण परदेशी नागरिक नाही हे संबंधित व्यक्तिला स्वतः सिध्द करून दाखवावे लागते.

## देश विदेश

# तुर्किये आणि पाकिस्तानच्या २४ सहकार्य करारांवर स्वाक्षऱ्या

■ इस्तंबूल

**तुर्कियेचे** अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यात इस्तंबूल येथे झालेल्या द्विपक्षीय बैठकीत ५ अब्ज डॉलरचा वार्षिक व्यापार गाठण्याच्या उद्दिष्टाची पुनरुक्ती करण्यात आली आहे. या देशांनी आर्थिक आणि धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी संरक्षण, ऊर्जा, बँकिंग आणि आरोग्य यांसह विविध क्षेत्रांतील २४ सहकार्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

दोन्ही नेत्यांमध्ये इस्तंबूलच्या वहिद्दिन पॅलेस येथे बंद दाराआड द्विपक्षीय चर्चा झाली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील आर्थिक भागीदारी आणि प्रादेशिक शांततेबाबत धोरणात्मक चर्चा करण्यात आली.

# पोप लिओ चौदावे यांची इटलीच्या लॅम्पेडुसा बेटाला भेट



■ रोम

**पोप** लिओ चौदावे यांनी इटलीच्या लॅम्पेडुसा बेटाला भेट देऊन युरोपीय नेत्यांना स्थलांतरितांच्या समस्येवर मात करण्यासाठी एका सर्वसमावेशक धोरणाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. या बेटाला भेट देणारे ते दुसरे पोप आहेत. यापूर्वी २०१३ मध्ये पोप फ्रान्सिस यांनी येथे भेट दिली होती.

या बेटावरील रेड क्रॉसद्वारे चालवल्या जाणाऱ्या स्थलांतरित स्वागत केंद्राला भेट देऊन तेथील लोकांचे सांत्वन केले. साडेतीन तासांच्या भेटीत त्यांनी समुद्रात जीव गमावलेल्या स्थलांतरितांच्या कबरींना भेट देऊन आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी स्थलांतरितांना समर्पित असलेल्या 'डोअर ऑफ युरोप' या स्मारकास्थळी पोहोचून प्रार्थना केली.

# पेरूच्या राष्ट्राध्यक्षपदी फुजीमोरींची अधिकृत घोषणा

■ लिमा

**पेरूच्या** राष्ट्रीय निवडणूक न्यायालयाने केइको फुजीमोरी यांना अधिकृतपणे अध्यक्षीय निवडणुकीत विजयी घोषित केले. ७ जून २०२६ रोजी पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या मतदानानंतर अनेक आठवडे मतपत्रिकांची बारकाईने तपासणी आणि डाव्या विचारसरणीचे प्रतिस्पर्धी रॉबर्टो सांचेझ यांच्याकडून झालेल्या फसवणुकीच्या आरोपांचे पुनरावलोकन करण्यात आले.

५१ वर्षीय पुराणमतवादी उमेदवार केइको फुजीमोरी यांना ५०.१३ टक्के मते मिळाली. त्यांनी डाव्या आघाडीचे नेते रॉबर्टो सांचेझ (४९.८६टक्के) यांच्यावर केवळ ४९,६४१ मतांच्या अत्यंत कमी फरकाने मात केली. २०११, २०१६

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

आणि २०२१ मधील सलग तीन पराभवांनंतर फुजीमोरी यांचा हा चौथा अध्यक्षीय निवडणूक प्रवास यशस्वी ठरला. या विजयासह त्या पेरूच्या निवडून आलेल्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष बनणार आहेत. फुजीमोरी २८ जुलै २०२६ रोजी ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी पेरूच्या १० व्या राष्ट्राध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारतील. केइको या पेरूचे माजी दिवंगत राष्ट्राध्यक्ष अल्बर्टो फुजीमोरी यांच्या कन्या आहेत.

# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. ६ जुलै २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | आत्मविश्वासाने महत्त्वाच्या कामांमध्ये सफलता मिळवाल. आर्थिक व्यवहार जपून करावेत. घरातील मंडळींचे सहकार्य लाभेल. |
| वृषभ | कामाचा ताण जाणवला तरी यश मिळेल. वरिष्ठांशी वाद टाळावेत. कामामध्ये काही बदल घडू शकतात. |
| मिथुन | नोकरीमध्ये अनुकूल वातावरण राहील. अचानक प्रवासाचा योग येईल. थोरामोठ्यांच्या ओळखी वाढतील. |
| कर्क | सरकारी कामांमध्ये सफलता मिळेल. कामानिमित्त दूरचा प्रवास घडेल. नोकरीत जबाबदारी वाढेल. |
| सिंह | कामे वेळेत पूर्ण करण्याकडे कल राहील. अति मेहनत घ्याल. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. सामाजिक क्षेत्रात मान वाढेल. |
| कन्या | वास्तुसंबंधित कामांमध्ये सफलता मिळेल. तुमच्या योजना उघडपणे बोलू नका. खर्चाचे प्रमाण वाढेल. सहकारी साथ देतील. |
| तूळ | नोकरीत तुम्हाला दिलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडाल. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांना अनुकूल काळ. छोट्या सहलीचा आनंद घ्याल. |
| वृश्चिक | तुम्ही केलेल्या योजना लांबणीवर पडण्याची शक्यता. रागावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. संततीच्या शुभवार्ता समजतील. |
| धनु | घरातील कामांमध्ये सतत व्यस्त रहाल. नोकरीत इतरांशी पटवून घ्यावे लागेल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. |
| मकर | नवीन ओळखीचा फायदा होईल. खाण्याची पथ्ये पाळावीत. आवडत्या व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. |
| कुंभ | नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. विरोधकांवर मात करण्यात सफलता मिळेल. कुटुंबात सलोखा राहील. |
| मीन | रखडलेल्या कामांमध्ये जिद्दीने यश मिळवाल. नोकरीत सफलता मिळेल. चमचमीत भोजनाचा आस्वाद घ्याल. |

# लॉटरी

## गणेशलक्ष्मी वैभव साप्ताहिक लॉटरी — सोडत वेळ 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 05/07/2026

पहिले साप्ताहिक बक्षिस रु. 10000/- : MG-05 : 4544

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 3448 |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 7765 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 2809 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0468 | 3846 | 5059 | 5461 | 5668 | 5772 | 6665 | 6858 | 6893 | 7213 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0648 | 1075 | 1447 | 3364 | 3684 | 4355 | 5442 | 7557 | 9841 | 9843 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1319 | 2431 | 3178 | 3938 | 4774 | 5340 | 6995 | 7798 | 8594 |
| | | 1555 | 2437 | 3192 | 4007 | 4840 | 5374 | 7078 | 7810 | 8631 |
| | | 1568 | 2443 | 3231 | 4083 | 4877 | 5427 | 7127 | 7877 | 8654 |
| 0007 | 0762 | 1681 | 2455 | 3267 | 4123 | 4894 | 5455 | 7134 | 7981 | 8676 |
| 0039 | 0786 | 1737 | 2457 | 3309 | 4154 | 4920 | 5500 | 7136 | 8018 | 8686 |
| 0051 | 1043 | 1811 | 2585 | 3310 | 4191 | 4938 | 5653 | 7178 | 8094 | 8849 |
| 0067 | 1081 | 1901 | 2654 | 3338 | 4226 | 4943 | 5767 | 7251 | 8104 | 8855 |
| 0108 | 1111 | 1952 | 2777 | 3353 | 4271 | 4949 | 5810 | 7357 | 8131 | 8898 |
| 0285 | 1121 | 1955 | 2872 | 3386 | 4344 | 4961 | 5956 | 7458 | 8223 | 9168 |
| 0333 | 1131 | 2004 | 2926 | 3438 | 4461 | 4986 | 6092 | 7571 | 8236 | 9293 |
| 0350 | 1136 | 2035 | 2927 | 3473 | 4494 | 4994 | 6147 | 7587 | 8300 | 9397 |
| 0381 | 1138 | 2120 | 2931 | 3528 | 4514 | 4995 | 6176 | 7634 | 8302 | 9858 |
| 0410 | 1211 | 2191 | 2998 | 3533 | 4585 | 5005 | 6266 | 7702 | 8388 | 9957 |
| 0455 | 1219 | 2256 | 3009 | 3552 | 4741 | 5050 | 6294 | 7734 | 8545 | 9969 |
| 0509 | 1245 | 2354 | 3152 | 3638 | 4742 | 5115 | 6766 | 7761 | 8572 | 9978 |
| 0606 | 1318 | 2430 | 3165 | 3730 | 4756 | 5220 | 6992 | 7791 | 8578 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत वेळ 4:45 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 05/07/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : GL-03 : 4182

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | क्रमांक |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1940 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 4960 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1608 | 2071 | 3667 | 3915 | 4237 | 4299 | 4734 | 5347 | 5577 | 5946 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2183 | 2335 | 2660 | 2813 | 3323 | 4263 | 4360 | 4634 | 5658 | 5955 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1014 | 1450 | 2093 | 2772 | 3209 | 3696 | 4115 | 4465 | 4984 | 5563 |
| 1025 | 1619 | 2111 | 2773 | 3318 | 3734 | 4237 | 4490 | 5075 | 5588 |
| 1087 | 1636 | 2227 | 2861 | 3346 | 3769 | 4273 | 4491 | 5152 | 5639 |
| 1091 | 1812 | 2288 | 2862 | 3353 | 3896 | 4347 | 4533 | 5277 | 5712 |
| 1118 | 1863 | 2308 | 2922 | 3363 | 3903 | 4394 | 4646 | 5425 | 5734 |
| 1157 | 1871 | 2467 | 2928 | 3386 | 3932 | 4407 | 4647 | 5435 | 5756 |
| 1189 | 1919 | 2559 | 2972 | 3553 | 3997 | 4422 | 4676 | 5472 | 5791 |
| 1206 | 2000 | 2685 | 3100 | 3572 | 4030 | 4445 | 4768 | 5477 | 5865 |
| 1224 | 2006 | 2693 | 3132 | 3612 | 4046 | 4451 | 4864 | 5487 | 5889 |
| 1269 | 2019 | 2723 | 3147 | 3666 | 4075 | 4454 | 4874 | 5502 | 5987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ६/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ३ | ८ |
| ७१ | ३० | ८० |
| ७६ | ३५ | ८५ |
| १६० | १२० | १२५ |
| ३५९ | ३४६ | ४६८ |

पान १ वरून - यावेळी आधी रामरक्षा स्तोत्र आणि नंतर हनुमान चालिसाच्या पठणासह महाआरती करून राज्यव्यापी आंदोलनाचा शंखनाद करण्यात आला. किशोरी पेडणेकर यांनी मारुती स्तोत्र म्हटले. या आंदोलनाला थेट अयोध्येहून आलेले काही साधू-महंत उपस्थित होते. यावेळी 'जय श्रीराम, पवनपुत्र हनुमान की जय', 'जय शिवाजी जय भवानी' अशा घोषणाही देण्यात आल्या. महाआरती झाल्यानंतर उद्धव ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले की, हिंदू भोळा आहे, पण तो मूर्ख नाही. जय श्रीरामाची घोषणा देऊन ते सत्तेत आले. राम मंदिराबाबत शिवसेनेने शिलापूजन आणि कारसेवा केली होती. रथयात्रा काढल्या. या मंदिरासाठी अनेक लोकांचे जीव गेले.

# उद्धव ठाकरेंचे रामरक्षा आंदोलन

मुंबईकरांनीही सोसले. बॉम्बस्फोट आणि दंगली झाल्या. त्यावेळी केवळ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाची आक्रमक भूमिका घेतली. ज्या राम मंदिरासाठी आपण मेहनत केली, तीच व्यक्ती आज पंतप्रधानपदी बसली आहे. मात्र, पंतप्रधान बनल्यानंतर त्यांनी शिवसेना संपण्याचा अफजलखानी विडा उचलला. ते हिंदुत्वाचा गैरफायदा घेत आहेत. अयोध्या सिर्फ झाकी आहे, आता काशी आणि मथुरा बाकी आहे. आता त्यांना काशी आणि मथुरा लुटायची आहे. मध्य प्रदेशातील महाकाळ मंदिराची जमीन लुटली. आता अयोध्याच्या बातम्या येत आहेत. बद्रीनाथमध्येही चोरी झाली. आम्ही राम मंदिरासाठी देणगी आणि चांदीची वीट दिली होती. हे सर्व कुठे गेले? हा हिंदुत्वाचा अपमान करत आहे. एका साधूने सांगितले की, राम मंदिरात जाताना आमची लंगोटीही तपासली जात आहे. साधूंना अशी वागणूक दिली जात आहे आणि याच मंदिरासाठी लोकांनी दिलेले दान गायब केले जात आहे. बाळासाहेब ठाकरेंनी ज्याप्रकारे हिंदूंना जागे केले होते, त्याप्रमाणे आता मला पुन्हा हिंदूंना जागे करायचे आहे. राम मंदिर चोरीप्रकरणी चौकशी झाली पाहिजे, हिंदूंना विनंती आहे की, तुम्ही जागे राहा. ते हिंदुत्वाचा गैरफायदा घेत आहेत. ज्या लोकांनी मंदिरात चोरी केली आहे. त्यांना लोकांनी जाब विचारावा. चोरांनी रामाच्या घोषणा आणि भगवा घेता कामा नये. मला म्हणता की, मी हिंदुत्व सोडले. हे काय, माझ्यासोबत आज हिंदू मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. मग तुम्ही कुठे आहात. हिंदूनो, गावागावात आणि खेड्याखेड्यात श्री रामाची आरती करा, तुमच्या गावात रामाचे मंदिर नसले तर रामाचा फोटो ठेवून आरती करा. देशातील हिंदू एकजुटीने समोर आला पाहिजे. त्या चोरट्यांना तडीपार करुया, अब हिंदू माफ नही करेगा. तुमची कोणतीच मोहिनी विद्या चालणार नाही, हिंदूनो जागे राहा, या प्रकरणाची चौकशी होऊन निकाल लागत नाही, तोपर्यंत गप्प आणि स्वस्थ बसू नका.






## महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत वेळ 4:30 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 30/- • सोडत दिनांक 05/07/2026

पहिले साप्ताहिक बक्षिस रु. 10000/- : MO-06 : 3947

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 3055

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1180 | 1223 | 1681 | 2379 | 3504 | 3764 | 4484 | 4747 | 5814 | 5826 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1296 | 1626 | 2361 | 2661 | 2851 | 3200 | 3760 | 4059 | 5152 | 5395 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1013 | 1172 | 1516 | 2840 | 4140 | 4514 | 5332 | 5574 | 5630 | 5852 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2098 | 2772 | 3069 | 3893 | 4434 | 5089 |
| | | 2211 | 2790 | 3072 | 3929 | 4440 | 5310 |
| 1082 | 1330 | 2247 | 2804 | 3319 | 3963 | 4453 | 5505 |
| 1100 | 1364 | 2259 | 2812 | 3361 | 3968 | 4462 | 5561 |
| 1111 | 1421 | 2334 | 2842 | 3397 | 3988 | 4478 | 5568 |
| 1146 | 1469 | 2367 | 2876 | 3400 | 4012 | 4488 | 5586 |
| 1149 | 1544 | 2402 | 2904 | 3455 | 4042 | 4657 | 5597 |
| 1169 | 1667 | 2501 | 2956 | 3491 | 4046 | 4674 | 5653 |
| 1175 | 1677 | 2509 | 2967 | 3563 | 4069 | 4748 | 5758 |
| 1200 | 1791 | 2529 | 2971 | 3638 | 4094 | 4955 | 5759 |
| 1217 | 1817 | 2605 | 2972 | 3694 | 4321 | 4986 | 5767 |
| 1243 | 1991 | 2662 | 3040 | 3717 | 4344 | 5007 | 5866 |
| 1288 | 1994 | 2728 | 3043 | 3838 | 4376 | 5023 | 5967 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# पद्मविभूषण तीजन बाई यांचे निधन

पान १ वरून

आवड निर्माण झाली. पुढे गायक उमेद सिंह देशमुख यांनी त्यांना या लोककलेचे प्रशिक्षण दिले. अवघ्या १३व्या वर्षी त्यांनी पहिला सार्वजनिक कार्यक्रम सादर केला आणि त्यानंतरचा त्यांचा कलाप्रवास अखंड सुरू राहिला. त्या काळात महिलांना पंडवानीची 'वेदमती' शैली बसून सादर करण्याचीच परवानगी होती. मात्र तीजन बाई यांनी सर्व सामाजिक बंधने झुगारून देत उभे राहून सादर केली जाणारी 'कापालिक' शैली स्वीकारली. या शैलीत सादरीकरण करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या. या धाडसी निर्णयामुळे त्यांना समाजाच्या रोषालाही सामोरे जावे लागले, पण त्यांनी कलेशी तडजोड केली नाही.

औपचारिक शिक्षण न घेताही त्यांनी कलेच्या जोरावर मोठे यश मिळवले. साक्षरता मोहिमेद्वारे त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले असले तरी त्यांच्या असामान्य योगदानाबद्दल त्यांना चार वेळा 'डी.लिट.' ही मानद पदवी मिळाल्या होत्या. भारतीय लोककलेतील योगदानाची दखल घेत त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरवले होते.

# मुरबाडी नदीवरील नवा पुलाचा भराव वाहून गेला! पुलाला तडे

■ मुरबाड

**राष्ट्रीय** महामार्ग ६१ वर धानिवली जवळील मुरबाडी नदीवर बांधण्यात आलेल्या नव्या पुलाला मातीचा भराव वाहून गेल्याने काँक्रिटला तडा गेल्याने पहिल्याच पावसात हा पूल धोकादायक स्थितीत आला आहे. नव्या तंत्रज्ञानाने बनविण्यात आलेल्या या पुलाच्या एका बाजूस संरक्षण भिंत अपूर्ण स्थितीत असल्याने चार दिवस पडलेल्या अतिवृष्टीमुळे पहिल्याच पावसात महामार्गावरील काँक्रिटला तडे गेल्याने या निकृष्ट व अपूर्ण कामाच्या चौकशीची मागणी करण्यात येत आहे. ठेकेदाराचा निष्काळजीपणा व राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांचा डोळेझाकपणा यामुळे या अपूर्ण कामाचा फटका वाहन चालकांना बसत आहे. याबाबत राष्ट्रीय महामार्गचे अधिकारी गौरव सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मातीच्या भरावात पाणी शिरल्याने व मातीची साईड पट्टी बनवण्याऐवजी काँक्रिटची साईड पट्टी बनवल्याने हा तडा गेला. मातीची साईड पट्टी बनवली असती तर हा तडा गेला नसता.

# डे केअर सेंटरचा पर्दाफाश करणाऱ्या महिलेलाच अटक

■ बंगळुरु

**बंगळुरूच्या** कॅपजेमिनी डे केअर सेंटरमध्ये बालकांचा छळ केला जात असल्याचे धक्कादायक वास्तव जगासमोर आणणाऱ्या महिलेलाच पोलिसांनी अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणातील ही पहिली अटक आहे. सुजाता असे या महिलेचे नाव आहे. तिने कॅपजेमिनी डे केअर सेंटरमध्ये लहान बालकांचा कसा छळ केला जातो याचे व्हिडिओ चित्रीकरण करून तो व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. तो व्हिडिओ पाहून जनतेमध्ये संतापाची लाट उसळली होती. आता त्याच सुजाताला पोलिसांनी विविध आरोप ठेवून अटक केली आहे. महत्त्वाचे व्हिडिओ फुटेज पोलिसांच्या स्वाधीन करण्यास टाळाटाळ करणे, काही व्हिडिओ क्लिप जाणूनबुजून डिलिट करणे आणि महत्त्वाचे पुरावे लपवणे,असे आरोप पोलिसांनी सुजाता हिच्यावर ठेवले आहेत.

# मुंबईतील झाडांच्या मुळांशी असलेले काँक्रिटीकरण हटवा

**वकिलाची पालिकेला कायदेशीर नोटीस !**

■ मुंबई

**मुंबई** शहरात काँक्रीटीकरणामुळे झाडांच्या मुळांना ऑक्सिजन व पाणी मिळत नसल्याने ते कमकुवत होत आहेत. हे टाळण्यासाठी वकील हितेंद्र गांधी यांनी संपूर्ण मुंबईत झाडांच्या मुळांशी असलेले काँक्रिट हटवण्याची मागणी करत मुंबई महापालिकेला कायदेशीर नोटीस धाडली आहे.

हितेंद्र गांधी यांनी पालिका आयुक्तांना पाठवलेल्या कायदेशीर नोटिशीत म्हटले आहे की, पालिका प्रशासनाने



संपूर्ण मुंबईत एक सर्वसमावेशक 'डी-काँक्रीटीकरण' मोहीम राबवावी. यासाठी झाडांच्या खोडाभोवती असलेल्या एक मीटरच्या परिघातून काँक्रिट, पेव्हर ब्लॉक्स आणि इतर पाणी न मुरणारे साहित्य त्वरित काढून टाकावी. तसेच जानेवारी २०२३ पासून रस्ते काँक्रीटीकरण, पदपथांची कामे आणि विविध सेवावाहिन्यांच्या प्रकल्पांची कामे झाली आहेत.त्यामध्ये नुकसान झालेल्या झाडांची नोंद सार्वजनिक करावी. रस्ते विकास आणि नागरी पायाभूत सुविधा शहरासाठी आवश्यक असल्या, तरी झाडांचे आरोग्य आणि सार्वजनिक सुरक्षिततेचा बळी देऊन अशा सुविधा उभारल्या जाऊ नयेत.चेंबूरमध्ये घडलेल्या घटनेतील भागात रस्त्यांच्या कामांदरम्यान झाडांच्या मुळांचे नुकसान झाल्याची चिंता आधीच व्यक्त करण्यात आली होती.

# राज्यपालांच्या सहीअभावी कर्जमाफी रखडली! ५ जुलैची तारीखही हुकली

**मुंबई** - राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीला पुन्हा विलंब झाला असून, ३० जूननंतर ५ जुलैची मुदतही हुकली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर येथे बोलताना सरकारची अडचण आणि भूमिका स्पष्ट केली. याबाबत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, कर्जमाफीसाठी आवश्यक असलेल्या पुरवणी मागण्या पावसाळी अधिवेशनात मंजूर केल्या जातील. त्यानंतर राज्यपालांची स्वाक्षरी झाल्यावर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात येईल. घाईगडबडीत कोणतीही चूक होऊ नये आणि पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळावा, यासाठी प्रक्रिया काळजीपूर्वक राबवली जात आहे.

# पनवेलमध्ये ४३५ नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिका क्षेत्रात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन पूर्णपणे अलर्ट मोडवर असून बाधित नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार आतापर्यंत सुमारे ४३५ नागरिकांचे चार तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले असून, त्यांना चहा, नाश्ता, जेवण, पिण्याचे पाणी तसेच अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अतिवृष्टीमुळे पाणी साचणाऱ्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत पनवेलमधील पटेल मोहल्ला व कच्ची मोहल्ला परिसरातील भारतनगर झोपडपट्टीतील १४९ नागरिकांना उर्दू शाळेत, २११ नागरिकांना कोळीवाडा शाळेत, तर एचओसी कॉलनी आदिवासी वाडीतील ७५ नागरिकांना क्रीडा संकुलात सुरक्षितरित्या स्थलांतरित करण्यात आले आहे. भांडार विभागामार्फत या सर्व नागरिकांना चहा, बिस्किटे, नाश्ता, पिण्याचे पाणी व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेनुसार स्थलांतरित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

# पावसाळ्यामध्ये पाचगणीत घोडे सवारी,घोडा गाडीवर बंदी

**पाचगणी** - मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने टेबललँड परिसरात २३ सप्टेंबर या कालावधीत घोडे सवारी आणि घोडागाडीच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की, काही घोडा व घोडागाडी चालकांकडून या आदेशाचे वारंवार उल्लंघन केले जात आहे.त्यामुळे संबंधितांना वेळोवेळी मनाई करण्यात येणार असून आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पाचगणी पोलीस ठाण्यात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी आपत्ती व्यवस्थापन, वृक्ष विभाग, बांधकाम विभाग तसेच नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

# गोव्यातील ग्रामीण भागात चढणीच्या माशांची पर्वणी

■ पणजी

**उत्तर** गोवा जिल्ह्यातील सत्तरी तालुक्यात पावसाचा जोर वाढताच नद्या, ओहोळ, धबधबे आणि शेतांमध्ये चढणीच्या माशांची हालचाल सुरू झाली. मासप्रेमींसाठी ही खरी पर्वणी ठरत आहे. दरवर्षी पावसाच्या सुरुवातीला प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वरच्या भागाकडे जाणाऱ्या या माशांना पकडण्यासाठी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत तरुणांसह अनेक मासेप्रेमी विविध ठिकाणी गर्दी करत आहेत. प्रामुख्याने केरी, केळावडे, शिरोली, साठयेचा धबधबा तसेच पर्ये सांखळी परिसरातील ओहोळ आणि जलप्रवाहांमध्ये चढणीचे मासे मिळत आहेत. पाण्याचा प्रवाह वाढल्यानंतर हे मासे नैसर्गिकरित्या वरच्या भागाकडे स्थलातर करतात. याच काळात त्यांना पकडण्यासाठी स्थानिक नागरिक पारंपरिक पद्धतींसह आधुनिक साधनांचाही वापर करत आहेत.

# महिला शेतकरी आंदोलकाचा भिंतीवर गळफास घेण्याचा प्रयत्न

**पैठणच्या तहसील कार्यालयातील घटना**

■ पैठण

**तालुक्यातील** ढोरकीन येथील महिला शेतकरी शोभा बबन कुदळे यांनी आपल्या जमिनीच्या सातबारावरील चुकीचा फेरफार रद्द करण्यासाठी पैठण तहसील कार्यालयाच्या भिंतीवर चढून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. महसूल प्रशासनाच्या दिरंगाईला कंटाळून त्यांनी हे अनोखे आंदोलन करत टोकाचे पाऊल उचलले.

शोभा कुदळे आणि त्यांच्या पतीच्या शेतीच्या सातबारा उताऱ्यावर एका अनोळखी व्यक्तीचे नाव चुकीच्या पद्धतीने नोंदवले गेले आहे. हे नाव रद्द करण्यासाठी त्या अनेक महिन्यांपासून तहसील कार्यालयात पाठपुरावा करत आहेत. यापूर्वी देखील त्यांनी मे महिन्यात याच मागणीसाठी तहसील परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन केले होते. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने, निराश होऊन त्यांनी पुन्हा एकदा तहसील कार्यालयाच्या भिंतीवर चढून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी व नायब तहसीलदारांनी घटनास्थळी धाव घेतली. प्रकरणाची कायदेशीर पडताळणी करून तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले.

# सह्याद्री एक्स्प्रेसमधील प्रवाशांची भिलवडीत लूट

■ मिरज

**कोल्हापूर**-पुणे-कोल्हापूर सह्याद्री एक्स्प्रेसमध्ये चोरी व फलाटावरील महिलेचे दागिने लुटले. भिलवडी स्थानकात पहाटे हा प्रकार घडला. पुणे येथील छाया अजय सोनेकर या एक्स्प्रेसमधून प्रवास करत होत्या. गाडी भिलवडी स्थानक परिसरात आली असता चोरट्याने त्यांची बॅग खिडकीतून हात घालून चोरून नेली. या बॅगेमध्ये मोबाईल, चष्मा, गॉगल, घड्याळ, ब्लूटूथसह ४४ हजारांचा ऐवज होता. मध्यरात्री एक्स्प्रेसमधून उतरलेल्या एका महिला प्रवाशाला प्लॅटफॉर्म क्रमांक २ वरील अंधाराचा फायदा



घेत दोन चोरट्यांनी गाठले. त्यांनी या महिलेच्या गळ्यातील ४ तोळ्यांचे सोन्याचे दागिने, पाच हजार रुपयांची रोकड आणि मोबाईल हिसकावून पलायन केले .महिलेने आरडाओरडा केल्यानंतर रेल्वे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले.मात्र तोपर्यंत चोरटे पसार झाले होते.

# महावितरणच्या दोन कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस

■ नाशिक

**जेल** रोड परिसरात १ जुलै रोजी झालेल्या वीज अपघात प्रकरणी महावितरण कंपनीने गंभीर दखल घेतली असून, कनिष्ठ तंत्रज्ञांच्या निलंबनानंतर नाशिक परिमंडळ आणि मंडळ कार्यालयाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन व सुरक्षा) यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सदर नोटीस कोकण प्रादेशिक कार्यालयाकडून बजावली आहे. या दुर्दैवी अपघातात महावितरणच्या जय सकट या कनिष्ठ तंत्रज्ञाचा मृत्यू झाला. यावेळी तंत्रज्ञ राजेश चौरे सोबत कार्यरत होते.

काम करताना आवश्यक सुरक्षित साधनांचा वापर केला नाही. तसेच सहकाऱ्याची काळजी घेतली नाही. या कारणांमुळे तंत्रज्ञ राजेश चौरे यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच विद्युत सुरक्षेची जबाबदारी असणारे दोन्ही कार्यकारी अभियंता यांनी जनमित्रांचे सुरक्षा साधनांचा वापर करण्यासंदर्भात योग्य प्रकारे प्रबोधन केले नाही, अशी विचारणा करीत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

# साताऱ्यात १४ वर्षीय विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

■ सातारा

**साताऱ्यात** १४ वर्षे वयाच्या मुलाचा आंघोळ करत असताना अचानक हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. स्वप्निल नामदेव आवकीरकर (१४) असे त्याचे नाव असून, तो सातारा तालुक्यातील ठोसेघर गावात राहत होता. ठोसेघर येथील आदर्श माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता नववीतील विद्यार्थी असलेला स्वप्निल आवकीरकर काल सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास घरी आंघोळ करत असताना त्याला अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. कुटुंबियांनी त्याला तत्काळ ठोसेघर येथून जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजूभैया भोसले यांनी आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती देऊन वैद्यकीय उपचाराबाबत सूचना केल्या.

# छ.संभाजीनगर सहकारी बँकेच्या निवडणुकीत खासदार कल्याण काळे यांचा विजय

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीकडे जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागले होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत काँग्रेसचे खासदार कल्याण काळे, आमदार संजना जाधव, भाजपचे शेषराव जाधव तसेच शिवसेनेचे प्रभाकर काळे यांनी विजय मिळवला. शिवाय मंत्री अतुल सावे आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हेही विजयी झाले आहेत.

या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा आणि प्रतिष्ठेचा ठरलेला बिगर शेती मतदारसंघ विशेष लक्षवेधी ठरला. या मतदारसंघातून खासदार कल्याण काळे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार अभिजीत देशमुख यांचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला. कल्याण काळे यांना ४८ मते मिळाली, तर अभिजीत देशमुख यांना २६ मतांवर समाधान मानावे लागले. या विजयामुळे काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या गोटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, आमदार संजना जाधव यांनीही एकतर्फी विजय नोंदवला. त्यांना ९८ मते मिळाली, तर त्यांच्या विरोधातील चारही उमेदवारांना एकही मत मिळाले नाही. भाजपाचे शेषराव जाधव यांनी ४९ मते मिळवत विजय संपादन केला. शिंदे गटाचे प्रभाकर काळे यांनी आपल्या मतदारसंघात शंभर टक्के मते मिळवत लक्ष वेधले.

# कुडाळमधील शाळा परिसरातील धोक्याची झाडे तोडण्याची मागणी

■ जावळी

**तालुक्यातील** कुडाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडीच्या परिसरामध्ये मोठमोठी झाडे आहेत. ही झाडे जुनी असून, पावसाळ्यामध्ये वादळवारा आला की, याच्या फांद्या तुटून कधी शाळेवर तर कधी जमिनीवर पडत असतात. सध्या पावसाळा सुरू असून याचा मोठा धोका संभवत आहे. त्यामुळे मुलांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होत असून, या परिसरातील धोकादायक स्थितीत असणारे वृक्ष तोडण्यात यावेत, अशी मागणी काही पालकांनी केली आहे.

शाळेच्या आवारात असलेल्या झाडाखाली शिक्षकांची वाहने लावलेली आहेत. तसेच लहान मुले, पालक, शिक्षकांची दररोज या ठिकाणी ये-जा होत असते. त्यामुळे चुकून झाडाची फांदी पडल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो. याबाबत जावली तालुक्यातील वन विभागाने पुढाकार घेऊन अंगणवाडी व शाळेच्या परिसरातील धोकादायक वाटणारी झाडे काढून टाकावीत अशी मागणी पालक आणि ग्रामस्थही करू लागले आहेत.

# कास पुष्प पठारावर फुलला अत्यंत दुर्मीळ 'सातारी तुरा'

■ सातारा

**जागतिक** वारसा स्थळ असलेल्या कास पुष्प पठार परिसरात दोन-तीन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असताना अत्यंत दुर्मीळ व साताऱ्याचे नाव फुलांमधून जागतिक पटलावर कोरणाऱ्या 'सातारी तुरा' म्हणजेच 'वायतुरा' या दुर्मीळ फुलाचे आगमन झाले आहे. त्यामुळे जैवविविधतेची चाहूल



पठाराला लागली आहे.

दुर्मीळ प्रजाती म्हणून 'वायतुरा' ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील पश्चिम घाटात सितारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांत आढळणारी अत्यंत दुर्मीळ वनस्पती आहे. या वनस्पतीला सातारी तुरा, सातारेन्सिस किंवा वायतुरा असेही संबोधले जाते. या वनस्पतीला दोन ते तीन पानांच्या बेचक्यातून एक लांब दांडा वर येतो. या दांड्याच्या टोकावर इंग्रजी वाय अक्षरासारखा दोन भागांत विभागलेला फुलांचा तुरा येतो. या विशिष्ट रचनेमुळे प्रसिद्ध वनस्पती अभ्यासक श्रीकांत इंगळहळीकर यांनी याला 'वाय-तुरा' असे नाव दिले.

# ऐन सणासुदीच्या तोंडावर भगर व साबुदाणा महागला

■ नागपूर

**ऐन** सणासुदीच्या तोंडावर उपवासाच्या प्रमुख पदार्थांच्या दरांमध्ये मोठी दरवाढ झाली. भगर म्हणजेच वरीच्या किमतीने उच्चांक गाठला असून, भगरीच्या दराने यंदा जुने सर्व विक्रम मोडीत काढले. साबुदाणाही प्रति किलो १५ रुपयांनी महागला.

चालू वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच जानेवारीत १०० रुपये प्रति किलो मिळणारी भगर आता थेट दुप्पट २०० रुपयांवर पोहोचली आहे. नाशिकमध्ये पावसाने दगा दिल्याने उत्पादन घटले असून, छत्तीसगड, तामिळनाडूमध्ये उत्पादन चांगले आहे. बाजारातील अपुरा पुरवठा आणि वाढती मागणी हे दरवाढीमागील मुख्य कारण असल्याचे साबू ट्रेड प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक गोपाल साबू यांनी सांगितले.



श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पादुका व डॉक्टर दिंडी श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर आषाढी एकादशी वारी प्रस्थान सोहळा, श्री स्वामी समर्थ महाराज मठ, शिवसेना भवन शेजारी दादर येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ झाली (छाया: दीपक साळवी)

# पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला मावळातील शेतकऱ्यांचा विरोध कायम

■ पुणे

**पवना** बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांचा विरोध कायम असून, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय हा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत राबवू दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका माजी राज्यमंत्री व भाजपा नेते बाळा भेगडे यांनी मांडली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

बाळा भेगडे म्हणाले की, मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी विविध प्रकल्पांसाठी आतापर्यंत सुमारे २५ हजार एकर जमीन दिली आहे. पवना धरणासाठी १९ गावे विस्थापित झाली असून, त्यांचे पुनर्वसनाचे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना विश्वासात न घेता बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचा निर्णय घेणे योग्य नाही. या प्रकल्पाला कालही विरोध होता, आजही आहे आणि उद्याही राहणार. प्रशासनाने शेतकरी प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा झाल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये. शेतकऱ्यांच्या भावना आणि हक्कांचा विचार करणे आवश्यक आहे.

# शिरोळ तालुक्यातील तीन बंधारे पाण्याखाली

**पंचगंगेचे पाणीही तब्बल ४१ फुटांवर**

■ कोल्हापूर

**कृष्णा** आणि पंचगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे या दोन्ही नद्यांच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. पंचगंगा नदीची तेरवाड बंधाऱ्यावरील पातळी काल शनिवारी ४१ फुटांवर पोहोचली होती. सध्या शिरोळ तालुक्यातील पंचगंगा नदीवरील दोन बंधारे आणि कृष्णा नदीवरील राजापूर बंधारा पाण्याखाली गेले आहेत.२८ हजार १२५ क्युसेक इतका विसर्ग कर्नाटक राज्यात सुरू आहे.

पंचगंगा नदीवरील तेरवाड बंधाराही पूर्णपणे पाण्याखाली गेला असून बंधाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात जलपर्णी येऊन तुंबली आहे. पाणी पातळी आणखी वाढल्यानंतर ही जलपर्णी प्रवाहाबरोबर वाहून जाण्याची शक्यता आहे.कृष्णा नदीची पातळी १४ फुटांवर पोहोचली असून, कराड येथे १४ फूट ८ इंच, राजाराम बंधाऱ्यावर ११ फूट १० इंच, आयर्विन पुलाजवळ ६ फूट, ताकारी येथे ११ फूट २ इंच, बहे येथे ४ फूट, तर मिलवडी येथे ९ फूट पाणी नोंदविण्यात आले आहे. नदीच्या सर्वच ठिकाणी पाणी पातळीत वाढ होत असल्याने पाटबंधारे विभाग परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

# आजपासून पाडेगावात हजरत पठाणशाह बाबांचा उरूस

■ खंडाळा

पाडेगाव येथील हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाहच्या ४२ व्यात उरूसाला उद्या ६ जुलैपासून प्रारंभ होत आहे. तीन दिवस हा उरूस साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमासह महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

हजरत पठाणशाह बाबांच्या या उरूसानिमित्त भव्य विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. सोमवारी सायंकाळी दर्गाहपासून नीरा शहरातून संदलची मिरवणूक निघेल. रात्री दहा वाजता ही मिरवणूक पुन्हा दर्गाह येथे येईल. त्यानंतर बाबांच्या समाधीला धार्मिक विधिवत संदल लावला जाईल. त्यानंतर मंगळवार ७ रोजी उरुस असून बाबांच्या दर्शनासाठी नीरा, पाडेगाव, निंबुत, लोणंद, बारामती परिसरासह पुण्याहून दर्शनासाठी भाविक येतात. रात्री मिलादख्वाणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तिसऱ्या दिवशी ८ रोजी सकाळी नऊ वाजता कुराण पठण होईल. सकाळी ११ वाजता जियारतचा धार्मिक विधी करण्यात येईल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# किल्ल्यांना बदनाम करण्याचे कारस्थान

महाराष्ट्राच्या शौर्यशाली इतिहासाचे बलदंड साक्षीदार म्हणजे महाराष्ट्राला लाभलेले गडकिल्ले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी दीडशेवर किल्ले जिंकल्याचा इतिहास सांगितला जातो. इतक्या मोठ्या शौर्यशाली संपत्तीचा वारसा लाभला असताना त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्याचे काम राज्याच्या सत्ताधाऱ्यांनी केले. सध्या एका वेगळ्याच कारणाने हे गडकिल्ले पुन्हा चर्चेत आले आहेत. खरे तर गेल्यावर्षी 'युनेस्को'ने महाराष्ट्रातल्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीमध्ये समावेश केला. त्यानंतर तरी सरकारी यंत्रणा खडबडून जाग्या होतील आणि युद्धपातळीवर या गडकिल्ल्यांची सुधारणा करण्यापासून त्याची सविस्तर माहिती राज्यातल्या शाळाशाळांपर्यंत पोहोचवण्याबाबत उत्साह दाखवला जाईल असे वाटले होते. परंतु तसे काही झालेले नाही. उलट आता याच वारसा यादीमध्ये असलेला लोहगड किल्ला थिल्लर आणि सवंग बदनामीचा विषय झालेला पाहून आणखीनच खेद होतो. सिया सिंग आणि केतन अग्रवालच्या लग्न प्रकरणातल्या वितुष्टातून केतन अग्रवालला गडावरून ढकलून देण्याचा जो काही कृतघ्न प्रकार घडला त्यातून समाजमाध्यमांवर लोहगडाला निमित्त करून चित्रविचित्र माहिती प्रसारित होते आहे. टिंगलटवाळी करणारे रील्स बनवून इतक्या मोठ्या इतिहासाचा साक्षीदार असलेला लोहगड बदनाम करण्याचा प्रयत्न होतो आहे. काही सामाजिक संस्था, गिर्यारोहण संस्थांनी सरकारला निवेदन देऊन समाजमाध्यमांवर सुरू असलेली लोहगडाची बदनामी ताबडतोब थांबवण्याची विनंती केली आहे. खरे तर केतन अग्रवालचे हत्या प्रकरण घडल्यानंतर सरकारी पातळीवर वेगाने हालचाल होणे अपेक्षित होते. निदान वारसा यादीतल्या सगळ्याच गडकिल्ल्यांवर सुरक्षा वाढवणे, तिथे येणाऱ्या अतिउत्साही पर्यटकांना लगाम घालणे आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्यात तर तरुण पर्यटकांचे जत्थेच्या जत्थे या गडकिल्ल्यांवर धिंगाणा घालत असतात. ज्या ठिकाणी जाऊन एका शौर्यशाली इतिहासाची माहिती करून घेण्याची गरज असते. तिथे केवळ पिकनिक किंवा मौजमजा करणाऱ्या सहली जातात. याचा अर्थ सरकारी पातळींवरून या गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व इतक्या प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवलेच गेले नाही.

**लोहगडाची घटना आणि दुष्प्रवृत्ती**

आतादेखील वारसा यादीत समाविष्ट झालेल्या या बारा किल्ल्यांची डागडुजीसुद्धा युद्धपातळीवर सुरू झालेली नाही. ज्या स्थळांना जागतिक वारसा यादीचा मान मिळतो त्यांची धड देखभालही केली जात नाही. उलट त्याचे महत्त्व टिकवून ठेवण्याचा कोणताही प्रामाणिक प्रयत्न होत नाही. गडकिल्ल्यांच्या या शौर्यशाली सन्मानाला जपण्यामध्ये सरकारी यंत्रणा तितक्याच जबाबदार ठरतात. गेली अनेक दशकं सातत्याने महाराष्ट्राच्या या वैभवशाली बलदंड साक्षीदार किल्ल्यांना बदनामीचे धनी व्हावे लागते आहे. प्रत्येक किल्ल्यांचा एक स्वतंत्र इतिहास आहे. त्याच्या बांधकामापासून तर तिथल्या अनेक प्रकारच्या सोयीसुविधांपर्यंत अतिशय उद्बोधक माहितीचा प्रसारही होऊ शकतो. महाराष्ट्राच्या राज्यगीतामध्ये सह्याद्रीच्या या किल्ल्यांना एकाअर्थी सिंह अशीच उपमा दिली गेली. 'सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभुराजा', कारण छत्रपतींच्या शौर्यातूनच सह्याद्रीचा गडकोट शत्रूला थरकाप उडवणारा ठरला होता. एका पोवाड्यामध्ये गडकिल्ल्यांचे वर्णन करताना असे म्हटले गेले की,

*गड म्हणजे महाराष्ट्राचा मान,*
*गड म्हणजे हिंदवी स्वराज्याची शान,*
*गिरीदुर्गांनी राखलिया महाराष्ट्राची सीमा,*
*तिथेच रूजली शिवरायांची गरिमा,*

असा हा महाराष्ट्राच्या शौर्याचा अलंकार ठरणारे गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्यात केंद्राचे पुरातत्व खाते आणि राज्याचेही सांस्कृतिक खाते अपयशी ठरलेले आहेत. केवळ शिवजयंती आणि शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशी या गडकिल्ल्यांची आठवण होते. मात्र वर्षभर किल्ल्यांच्या दुर्दशेकडे कोणाचेही लक्ष जात नाही. शत्रूंपासून महाराष्ट्राचे याच गडकिल्ल्यांनी संरक्षण केले. परंतु आता सरकारचा निष्काळजीपणा आणि समाजातल्या अनेक दुष्प्रवृत्तींपासून गडकिल्ल्यांचे संरक्षण करण्याची वेळ आलेली आहे. सध्या लोहगडाची होत असलेली बदनामी हा अशाच दुष्प्रवृत्तीचा भाग ठरतो. जो लोहगड दोन हजार वर्षे जुना म्हणजे अगदी पहिल्या किंवा दुसऱ्या शतकात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव अशा सगळ्यांच्या ताब्यात तो होता. पंधराव्या शतकात तो निजामशाहीच्या ताब्यात गेला, पण सोळाव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून आपल्या स्वराज्यामध्ये त्याला सामिल करून घेतले होते.

**सांस्कृतिक खात्याचे नवे खुळ**

दुर्दैवाची गोष्ट हीच आहे की, गेल्या अनेक दशकांपासून या किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा महाराष्ट्राच्या घराघरापर्यंत पोहोचवलाच गेला नाही. उलट नको त्या कारणांनी हे गडकिल्ले वादग्रस्त ठरत गेले. किल्ल्यांचे संवर्धन हा तर अतिशय महत्त्वाचा भाग ठरतो. परंतु त्याच्या डागडुजीसाठीसुद्धा राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशा निधीची तरतूद केली जात नाही. शिवनेरी आणि राजगडाला महत्त्व दिले की बाकी जबाबदारी संपली, असे राज्यकर्त्यांना वाटते. आता ज्या बारा किल्ल्यांना वारसा यादीत स्थान मिळाले आहे त्यातील एकेका किल्ल्याची सचित्र माहिती, ध्वनी आणि चित्रफितीसह तयार करता येऊ शकते. या किल्ल्यांची माहिती देणारे भव्य प्रदर्शन राज्यभरात ठिकठिकाणी भरवता येऊ शकते. यानिमित्ताने किल्ल्यांविषयी अभ्यासपूर्ण परिसंवाद, चर्चा, शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध, लेख, स्पर्धा घेता येऊ शकतात. परंतु राज्याच्या सांस्कृतिक खात्याच्या डोक्यात नवीनच खुळ खुळखुळते आहे. या किल्ल्यांवर सांस्कृतिक महोत्सव भरवण्याचा घाट घातला जातो आहे. कोणताही महोत्सव म्हटला की, मग तो दोन-चार दिवसांचा उत्साही धिंगाणाच असतो. या महोत्सवातून कोणतेही शाश्वत काम उभे राहत नाही. गिर्यारोहक किंवा इतिहासाचे अभ्यासक यांच्या मदतीने किल्ल्यांचे वैभव कसे जपले जाईल. ते केवळ मौजमजेचे पर्यटन स्थळ न होता महाराष्ट्राच्या इतिहासाचे दर्शन घडवणारे ठिकाण कसे राहील असे कायमस्वरूपी उपक्रम राबवण्याची आवश्यकता आहे. दिवाळीच्या काळात शाळकरी विद्यार्थीसुद्धा अतिशय आकर्षक किल्ले बनवतात. मुंबईतली एक संस्था या किल्ल्यांसाठी एक स्पर्धाही भरवते. अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

चांगल्या स्वभावाने नातं टिकतं. चांगल्या कर्माने संपत्ती टिकते. चांगल्या गुणांनी सन्मान मिळतो. ह्या तीन गोष्टी नेहमी आत्मसात करा.

## पंचांग

**सोमवार, ६ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण षष्ठी**
**नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०९-५६ कुंभ**
**०९-५७ ते २४-०० मीन**





**रवी उदय- ०६-०८**
**रवी अस्त- १९-१९**

**सूर्याचा पुनर्वसू नक्षत्र प्रवेश दुपारी १२.०२, वाहन-घोडा, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## स्टाईल क्रिस्पी पनीर लॉलीपॉप




**बाहेरून एकदम गोल्डन, क्रंची आणि आतून मऊ, रसाळ पनीर ही रेसिपी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडेल. एकदा नक्की ट्राय करा.**

★ **साहित्य :** २५० ग्रॅम पनीर (जाड चौकोनी तुकडे), १/२ कप मैदा, १/४ कप कॉर्नफ्लोअर, १ टीस्पून आले-लसूण पेस्ट, १ टीस्पून लाल तिखट, १ टीस्पून काळीमिरी पावडर, १/२ टीस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून चाट मसाला, चिमूटभर हळद, चवीनुसार मीठ, थोडंसं पाणी, १ कप ब्रेड क्रम्ब्स, तळण्यासाठी तेल, आईस्क्रीम स्टिक्स (ऐच्छिक).

★ **कृती :** पनीरच्या तुकड्यांना आईस्क्रीम स्टिक लावा (हवे असल्यास). एका भांड्यात मैदा, कॉर्नफ्लोअर, आले-लसूण पेस्ट, लाल तिखट, मिरी, गरम मसाला, हळद, मीठ आणि पाणी घालून घट्ट बॅटर तयार करा.

प्रत्येक पनीरचा तुकडा बॅटरमध्ये बुडवून ब्रेड क्रम्ब्समध्ये चांगला कोट करा. १० मिनिटे तसेच ठेवा. त्यामुळे कोटिंग चांगले सेट होईल.

गरम तेलात मध्यम आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. वरून चाट मसाला टाका आणि गरमागरम सर्व्ह करा. जास्त क्रिस्पी टेक्स्चर हवं असेल तर पनीरला डबल कोटिंग करा. एकदा बॅटर, मग ब्रेड क्रम्ब्स, पुन्हा बॅटर आणि पुन्हा ब्रेड क्रम्ब्स. यामुळे लॉलीपॉप अधिक कुरकुरीत होतात.




# ऑस्ट्रेलियाने ७ व्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला
## इंग्लंड संघाचा ७ विकेटने दारुण पराभव

**लॉर्ड्स मैदानावर झालेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर ७ विकेट आणि १७ चेंडू शिल्लक राखून विजय मिळवून या विश्वचषकावर सातव्यांदा आपले नाव कोरले. इंग्लंडने दिलेले १५१ धावांचे आव्हान ऑस्ट्रेलियाने बेथ मूनी (६४) आणि फोबी लिचफिल्ड (४८) यांच्या अफलातून फलंदाजीच्या बळावर १७.१ षटकांत सहज पूर्ण केले. या विजयासह ऑस्ट्रेलिया या स्पर्धेत सर्वाधिक जेतेपदे पटकावणारा हा सर्वात यशस्वी संघ आहे.**



■ लंडन

**या** रोमांचक सामन्यात, ऑस्ट्रेलियाची कर्णधार सोफी मोलिनक्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेक गमावल्यानंतर इंग्लंडच्या महिला संघाची सुरुवात निराशाजनक झाली. संघाची धावसंख्या केवळ ३२ धावा असतानाच दोन्ही सलामीवीर बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतल्या. त्यानंतर, कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंट आणि लिस कॅप्सी यांनी डाव सावरला आणि संघाची धावसंख्या ६७ धावांपर्यंत नेली. लिस कॅप्सी २३ धावा करून बाद झाली. त्यापाठोपाठ हेदर नाईट फक्त २ धावा करून माघारी परतली. शेवटी नॅट सायव्हर-ब्रंटच्या फ्रेया केम्पने २८ चेंडूंत नाबाद ४४ धावा केल्या. त्यासोबत नॅट सायव्हर-ब्रंटने ५३ चेंडूंत नाबाद ५८ धावा झोडल्या. त्यामुळे इंग्लंडने १५० धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना जॉर्जिया व्होलचा ९ धावांवर त्रिफळा उडाला. त्यानंतर बेथ मूनी आणि फोबी लिचफिल्ड यांनी वादळी खेळी करून हा सामना आपल्या संघाच्या बाजूने झुकवला. फोबी लिचफिल्ड ३५ चेंडूंत ४८ धावा करून बाद झाली. बेथ मूनी ६४ धावांवर बाद झाल्यानंतर अनुभवी एलिस पेरी आणि अ‍ॅशले गार्डनर यांनी संघाला १७.१ षटकांत विजय मिळवून दिला. त्यामुळे इंग्लंडचा ७ विकेटने पराभव झाला.

## राज्य कॅरम स्पर्धेत कोल्हापूरच्या नवोदित ओंकारची अपयशी झुंज

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** नरसोबा वाडीतील हॉटेल मंगलम येथे श्री दत्तराज चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित अशोक पुजारी यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या १० व्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटातील तिसऱ्या फेरीच्या सामन्यात १४ वर्षांच्या कोल्हापूरच्या ओंकार वडरने प्रेक्षकांची मने जिंकली. मात्र पुण्याच्या रविंद्र हांगे विरुद्ध त्याला तीन सेटच्या कडव्या झुंजीनंतर १४-१२, १४-२५ व १४-१५ अशी हार पत्करावी लागली. सातव्या बोर्डात ओंकारकडे १४-१० अशी आघाडी होती. परंतु शेवटचा ब्रेकचा फायदा उठवत रविंद्र हांगेने बाजी मारली.

पुरुष एकेरी तिसऱ्या फेरीत रविंद्र हांगेने ओंकार वडरवर १२-१४,२४-१५, १५-१४, मनोज कांबळेने अख्तर शेखवर २५-०, २५-२, भरत कोळीने अनंत भुतेवर १८-१७, २५-५, शैलेश सोळंकीने संजय मोहितेवर २०-१३, ०-२५, २३-८, रियाझ अकबर अलीने सुजित कुमार उकेवर २५-११, २५-९, रोहित चौगुलेने योगेश कदमवर २१-६, १९-६, महम्मद घुफ्रानने सुधाकर नाईकरेवर २५-०, २५-८ आणि वासिम शेखने धर्मराज रक्षेवर २३-१८, २५-१९ असा विजय मिळवला.

## ब्लिट्झमध्ये ग्रँडमास्टर प्रज्ञानंद पराभूत
## अलीरेझा फिरौजाने आघाडी घेतली

■ झाग्रेब

**भारतीय** ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद ग्रँड चेस टूरच्या क्रोएशिया टप्प्यात आपल्या प्रभावी रॅपिड फॉर्मची पुनरावृत्ती करण्यात अपयशी ठरला आणि ब्लिट्झच्या पहिल्या नऊ फेऱ्यांमध्ये त्याला केवळ ३.५ गुण मिळवता आले. दरम्यान, स्पर्धेचा केवळ एक दिवस शिल्लक असताना फ्रान्सच्या अलीरेझा फिरौजाने उत्कृष्ट कामगिरी करत एकहाती आघाडी घेतली आहे. अलीरेझाने वेगवान फॉरमॅटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत नऊपैकी आठ गुण मिळवले. २० गुणांसह, त्याने त्याचे निकटतम प्रतिस्पर्धी, उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि फ्रान्सचा मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्ह यांच्यावर तीन गुणांची भक्कम आघाडी घेतली. प्रज्ञानानंद १५.५ गुणांसह चौथ्या स्थानावर घसरला, तर विश्वविजेता डी. गुकेशची कामगिरीही साधारणच राहिली.

## पॅराग्वेचा पराभव करून फ्रान्स उपांत्यपूर्व फेरीत

■ फिलाडेल्फिया

फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रमुख दावेदार असलेल्या माजी विश्वविजेता फ्रान्सने पॅराग्वेला १-० ने हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. किलियन एम्बाप्पेचा एकमेव निर्णायक गोल केला. विश्वचषकात त्याचा ७ वा गोल होता. पराभूत संघाच्या ऑर्लँडो गिलला त्याच्या उत्कृष्ट गोलकीपिंगसाठी 'सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू' म्हणून गौरविण्यात आले.

दोन्ही संघांना पहिल्या हाफमध्ये गोल करता आला नाही. या उष्णतेमुळे फ्रान्स संघाला त्यांची नेहमीची आक्रमक शैली दाखवता आली नाही, तरीही त्यांनी पॅराग्वेची बचावाची भिंत भेदण्यात यश मिळवले. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये उस्मान डेम्बेले आणि मानू कोने यांनी सतत दबाव टाकला. अखेरीस ६९ व्या मिनिटाला व्हीएआर रिव्ह्यूनंतर फ्रान्सला पेनल्टी देण्यात आली. ७० व्या मिनिटाला फ्रान्सचा गोलरक्षक किलियन एम्बाप्पेने पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतर करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. या गोलमुळे एम्बाप्पेने विश्वचषक गोल्डन बूटच्या शर्यतीत लिओनेल मेस्सीची बरोबरी केली आणि आता तो विश्वचषकातील सर्वकालीन सर्वाधिक गोल करण्याच्या विक्रमात मेस्सीपेक्षा फक्त एक गोल मागे आहे.



सामना संपल्यानंतर पॅराग्वेचा गोलरक्षक ऑर्लँडो गिल हा एम्बाप्पेचे अभिनंदन करण्यासाठी आणि हस्तांदोलन करण्यासाठी पुढे आला होता.

**७ जुलैचा उपउपांत्य पूर्व सामना**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री ००:३० | पोर्तुगाल विरुद्ध स्पेन |
| पहाटे ०५:३० | अमेरिका विरुद्ध बेल्जियम |
| रात्री ९.३० | अर्जेंटिना विरुद्ध इजिप्त |

## बाबर ३ वर्षांनंतर पाकिस्तान कसोटी संघाच्या कर्णधारपदी

■ कराची

**वेस्ट** इंडिज आणि इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकांसाठी पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम पुन्हा एकदा पाकिस्तान कसोटी संघाचा कर्णधार बनला आहे. त्याला दुसऱ्यांदा कसोटी संघाची कमान सोपवण्यात आली. तर, शान मसूदला संघाच्या खराब कामगिरीमुळे कर्णधारपदावरून हटवण्यात आले. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आज कसोटी संघाची घोषणा केली. कर्णधारपदावरून हटवल्यानंतर शान मसूद कसोटी संघाचा भाग आहे. बोर्डाचे उच्च-कार्यक्षमता संचालक आकिब जावेद म्हणाले, 'शानची वैयक्तिक कामगिरी चांगली होती, मात्र कर्णधार म्हणून तो संघाला निकाल मिळवून देऊ शकला नाही. कर्णधाराची जबाबदारी केवळ नाणेफेकीपुरती मर्यादित नसते, तर सामना संपवणे, डीआरएस घेणे व संघाला योग्य दिशा देणे ही देखील त्याची जबाबदारी आहे.

## श्रीलंकेविरुद्ध भारतीय 'अ' संघाने कसोटी मालिका १-० ने जिंकली

■ कोलंबो



**भारतीय** 'अ' क्रिकेट संघासाठी श्रीलंका दौरा यशस्वी ठरला. तिरंगी एकदिवसीय मालिका जिंकल्यानंतर आता भारतीय 'अ' संघाने २ सामन्यांची कसोटी मालिकाही १-० अशा फरकाने जिंकली. पहिला सामना अनिर्णित राहिल्यानंतर दुसरा सामना भारतीय 'अ' संघाने १० विकेटने जिंकला. या सामन्यात साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, गुरप्रीत ब्रार, सारांश जैन यांचा मोलाचा वाटा राहिला.

या सामन्यात श्रीलंका 'अ' संघाने नाफेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली होती. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना ११० षटकात ३६६ धावा केल्या होत्या. याप्रत्युत्तरात भारताने पहिला डाव १४३.३ षटकात ९ बाद ५४३ धावांवर घोषित केला होता. त्यामुळे भारताला १७७ धावांची मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेला गुरनूर ब्रारच्या आक्रमणापुढे ४८.३ षटकात २०९ धावाच करता आल्या.



## यजमान कॅनडाचे विश्वचषकात आव्हान संपुष्टात
## मोरोक्को सलग दुसऱ्यांदा उपांत्यपूर्व फेरीत

■ ह्युस्टन

**ह्युस्टन** स्टेडियमवर फिफा विश्वचषकाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत मोरोक्कोने सहयजमान कॅनडाचा ३-० ने पराभव करून सलग दुसऱ्यांदा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. स्टार मिडफिल्डर अझेडिन ओनाहीने दुसऱ्या हाफमध्ये दोन गोल केले, तर सौफियान रहिमीने अतिरिक्त वेळेमध्ये गोल करून मोरोक्कोच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. आता मोरोक्कोचा सामना ९ जुलै रोजी उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सविरुद्ध होईल.

सामन्याच्या सुरुवातीला कॅनडाने उत्कृष्ट खेळ केला. सतत आक्रमण करत मोरोक्कोच्या बचावावर दबाव टाकला. सामन्यातील पहिली मोठी संधी कॅनडाला मिळाली. जेव्हा अली अहमदच्या पासवर टानी ओलुवासेयीने हेडरद्वारे गोल केला. मात्र, मोरोक्कोचा कॅनेडियन वंशाचा गोलकीपर यासिन बोनूने एक उत्कृष्ट बचाव करून आपल्या संघाला सुरुवातीच्या धक्क्यापासून वाचवले. पहिल्या हाफमध्ये मोरोक्कोला मोठा धक्का बसला, जेव्हा स्पर्धेतील त्यांचा आघाडीचा खेळाडू इस्माईल शबारीला स्नायूच्या दुखापतीमुळे २२ व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. त्याच्या जागी सौफियान रहिमी आला. दुसऱ्या हाफमध्ये मोरोक्कोने सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटले. ५० व्या मिनिटाला अश्रफ हकिमीच्या एका अप्रतिम सेट-पीस पासवर अझेडिन ओनाहीने बॉक्सच्या बाहेरुन अचूक टायमिंगवर एक शॉट मारून मोरोक्कोला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलमुळे मोरोक्कोचा आत्मविश्वास वाढला, तर कॅनडावर दबाव आला.

# सुख शांती समाधान

## सूर्यास्तानंतर या ५ गोष्टी करणे टाळावे



**वास्तुशास्त्राचा आपल्या जीवनावर खोलवर प्रभाव आहे. जर आपण कोणत्याही कामाच्या आधी किंवा दरम्यान विहित नियमांचे योग्य प्रकारे पालन केले तर त्याचे परिणाम आनंददायी आणि समृद्धी आणतात. मात्र, या नियमांकडे दुर्लक्ष केल्यास जीवनात समस्या निर्माण होऊ लागतात. आमच्या वास्तुशास्त्रात काही गोष्टींचा उल्लेख आहे. ज्या तुम्ही संध्याकाळी टाळल्या पाहिजेत. कारण संध्याकाळी तुमच्या घरात सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही ऊर्जा सक्रिय असतात. त्यामुळे संध्याकाळी या गोष्टी केल्याने तुमच्या घरातील शांती आणि आनंद आणि तुमच्या आर्थिक परिस्थितीवर थेट परिणाम होऊ शकतो. तर, संध्याकाळी घराची साफसफाई करू नका. वास्तुशास्त्रानुसार सूर्यास्तानंतर कधीही घर साफ करू नये. असे करणे अत्यंत अशुभ मानले जाते. असे वारंवार केल्यास देवी लक्ष्मी तुमच्यावर कोपते. या सवयीमुळे तुमच्या घरात पैशांची कमतरता भासू शकते.**

**असे** म्हटले जाते की, संध्याकाळी सकारात्मक ऊर्जा तुमच्या घरात प्रवेश करते. त्यामुळे तुम्ही या काळात घर स्वच्छ करण्यापेक्षा वातावरण शांत आणि व्यवस्थित ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. या काळात मुख्य प्रवेशद्वार, देवघर तसेच स्वयंपाकघरात काळोख करू नये. तेथे दिवे लावणे. या भागांना अंधारात ठेवल्याने तुमच्या जीवनात नकारात्मक ऊर्जा वाढते असे मानले जाते. प्राचीन काळी लोक संध्याकाळी आपल्या घरात दिवे लावायचे हे एक प्रमुख कारण आहे. जेव्हा तुम्ही या तिन्ही ठिकाणी दिवे लावता तेव्हा संपूर्ण घरात सकारात्मक वातावरण पसरते.

वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी घरात कधीही मोठ्याने बोलू नये किंवा कोणाशीही वाद घालू नये. असे केल्याने खूप वाईट परिणाम होऊ शकतात. यामुळे तुमच्या घरात नकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये तणाव वाढू शकतो. संध्याकाळी तुमच्या घरात शांतता आणि प्रेमाचे वातावरण कायम ठेवण्याचा प्रयत्न करा.

सूर्यास्तानंतर मुख्य दरवाजा बंद करू नका. संध्याकाळच्या वेळी तुम्ही तुमच्या घराचा मुख्य दरवाजा थोडा वेळ उघडा ठेवावा. असे करणे अत्यंत शुभ मानले जाते. असे म्हटले जाते की, मुख्य दरवाजा उघडा ठेवल्याने तुमच्या घरात सकारात्मक ऊर्जा आणि देवी लक्ष्मी येते. संध्याकाळी झोपणे टाळा. वडिलधारी माणसे आपल्याला सांगत असतात की, दिवेलागणीच्या वेळेस कोणी झोपू नये. वास्तुशास्त्र देखील असेच सांगते की संध्याकाळी झोपू नये. त्यामुळे आपल्या उर्जेवर नकारात्मक परिणाम होतो. झोपण्याऐवजी, प्रार्थना करा, स्तोत्र पठण करा, तसेच आपल्या कुटुंबासोबत गप्पा मारा, मज्जा मस्ती करा. त्यामुळे घरात वातावरण मंगलमय होईल.

## बाल्कनीत वॉशिंग मशीन ठेवण्याची योग्य पद्धत

**कपडे धुणे हे त्रासाचे काम असते. या त्रासातून बाहेर पडण्यासाठी आपण घरात वॉशिंग मशीन आणतो. आपल्या मनातून आनंद असतो की, आता आपल्याला कपडे धुण्यातून सुटका होणार. परंतु तुम्हाला हे माहीत आहे का? प्रत्येक गोष्टीसाठी एक शास्त्र असते. तुमच्या या छोट्याशा सवयीचा घराच्या सुखावर आणि आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम होऊ शकतो. आपण जेथे जागा असेल तेथे ही वॉशिंग मशीन ठेवतो. काही लोक बाल्कनीत ठेवतात. परंतु त्याचा परिणाम नकळत आपल्या जीवनावर होत असतो. त्यामुळे वॉशिंग मशीनची योग्य दिशा कोणती हे आपण पाहूया...**

काही जण बाल्कनीत वॉशिंग मशीन ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार, बाल्कनीमध्ये वॉशिंग मशीन ठेवणे अजिबात चुकीचे नाही. परंतु ते तुमच्या बाल्कनीच्या दिशेवर अवलंबून असते. वॉशिंग मशीनमध्ये दोन मुख्य घटक असतात ते पाणी आणि वीज/गती. यामुळे कपड्यांची घाण साफ होते. म्हणजेच नकारात्मकता बाहेर पडते. त्यामुळे मशीन चुकीच्या दिशेच्या बाल्कनीत ठेवल्याने घरातील ऊर्जा संतुलन बिघडू शकते. बाल्कनीच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला वॉशिंग मशीन ठेवण्यास मनाई आहे. उत्तर आणि पूर्व दिशा ही घराची पवित्र दिशा मानली जाते. कारण या दिशेतून सकारात्मक ऊर्जा आणि सूर्यप्रकाश घरात प्रवेश करतो.

त्यामुळे उत्तर आणि पूर्व दिशेच्या बाल्कनीत वॉशिंग मशीन ठेवून कपडे धुतले तर घाणेरडे पाणी आणि यंत्राचा आवाज सकारात्मक ऊर्जा रोखतात. त्यामुळे घरातील मुख्य व्यक्तीचा मान-सन्मान कमी होऊन आर्थिक नुकसानही होऊ शकते.

वास्तुनुसार जर तुमची बाल्कनी उत्तर-पश्चिम दिशेला असेल तर वॉशिंग मशीन ठेवण्यासाठी हे सर्वात योग्य ठिकाण मानले जाते.

ही दिशा हवेच्या प्रवाहाचे प्रतीक आहे, जे कपडे कोरडे करणे आणि जुनी नकारात्मक ऊर्जा काढून टाकणे दर्शवते. त्यामुळे वॉशिंग मशीनसाठी तुम्ही या जागेची निवड करून शकता.

वॉशिंग मशीन दक्षिण किंवा पश्चिम दिशेला असलेल्या बाल्कनीमध्ये देखील ठेवता येते. कारण या दिशा जड वस्तूंसाठी अनुकूल मानल्या जातात. परंतु बाल्कनीच्या मध्यभागी मशीन न ठेवणे चांगले आहे. ते एका कोपऱ्यात ठेवणे चांगले आहे.



तुम्ही जर वॉशिंग मशीन बाल्कनीत ठेवत असाल तर ४ महत्त्वाच्या गोष्टी तुम्हाला जाणून घेणे जरुरीचे आहे. जर तुमच्या फ्लॅटमध्ये उत्तर-पश्चिम दिशेला बाल्कनी नसेल आणि तुम्हाला मशीन दुसऱ्या दिशेला ठेवावी लागत असेल, तर तुम्ही खालील वास्तू उपायांचा अवलंब करून दोष कमी करू शकता- वॉशिंग मशीन नेहमी झाकून ठेवा. जेव्हा मशीन वापरात नसेल तेव्हा त्यावर चांगले फॅब्रिकचे आवरण ठेवा. ओपन मशीन नकारात्मक ऊर्जा आकर्षित करते, असे म्हटले जाते. त्यामुळे लक्षात ठेवा इतर कुठे तुम्ही मशीन ठेवत असाल ते झाकून ठेवा.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

## एकादशीचा उपवास करताय, हे लक्षात ठेवा...



**हिंदू धर्मात,** एकादशी हा भगवान विष्णूच्या पूजेसाठी सर्वात शुभ दिवस मानला जातो. एकादशी महिन्यातून दोनदा, कृष्ण पक्षात आणि शुक्ल पक्षात येते. भगवान विष्णु तसेच पांडुरंगाचा आशीर्वाद देणारी ही एकादशी होय.

पौराणिक मान्यतेनुसार, एकादशीचा उपवास केल्याने माणसाच्या जीवनातील दुःख आणि दारिद्र्य दूर होते आणि त्याला सुख-समृद्धीसह कीर्ती व प्रसिद्धीचा आशीर्वाद मिळतो.

हिंदू मान्यतेनुसार, भगवान श्री विष्णूच्या पूजेसाठी पाळल्या जाणाऱ्या एकादशीच्या व्रताच्या दिवशी पिंपळाच्या मुळाशी पाणी अर्पण केल्याने व्यक्तीची कर्जमुक्ती होते. तुळशीजींना विष्णुप्रिया म्हटले जाते, म्हणूनच एकादशीच्या व्रताच्या दिवशी तुळशीजींची पूजा करताना जर एखाद्या व्यक्तीने गाईच्या दुधापासून बनवलेल्या देशी तुपाचा दिवा लावला, तर त्याच्यावर भगवान विष्णू यांच्यासह देवी लक्ष्मीचा विशेष आशीर्वाद वर्षाव होतो आणि त्याला कधीही धन व धान्याची कमतरता भासत नाही.

## गॅस टँकर-ट्रकची धडक! आग लागून दोघांचा मृत्यू

■ जळगाव

**पारोळा**-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील सबगव्हाण टोलनाक्याजवळ गॅस टँकर-ट्रकची धडक झाली. या अपघातात दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला.

टोल भरण्यासाठी एक ट्रक उभा होता. त्यावेळी धुळ्याकडून पारोळ्याकडे येणाऱ्या गॅसने भरलेल्या टँकरचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून त्याने पुढे उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर टँकरने पेट घेतला आणि आगीने रौद्ररूप धारण केले. या आगीत टँकर चालक आणि क्लिनरचा जागीच होरपळून मृत्यू झाला. टँकर पूर्णपणे जळून खाक झाला. टोलनाक्यावरच ही घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, तहसील प्रशासन तसेच पारोळा नगरपालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले. अपघातानंतर काही काळ वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक दोन ते तीन तास ठप्प झाली होती. आग विझवल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

## देवळाली छावणी बोर्ड अधिकाऱ्याची कोट्यवधींची मालमत्ता! सीबीआय चौकशी

■ नाशिक

**देवळाली** छावणी बोर्डाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अजय कुमार यांच्याविरोधात सीबीआयने बेहिशेबी मालमत्ता कमावल्याप्रकरणी गुन्हा नोंदवल्याने एकच खळबळ उडाली आहे. नोकरीच्या सुरुवातीच्या काळात फक्त ५२ हजार रुपयांची संपत्ती घोषित करणाऱ्या अजय कुमार यांच्या मालमत्तेत काही वर्षांत कोट्यवधी रुपयांची वाढ झाली आहे.

अजय कुमार यांच्या मालमत्तेत झालेली ही वाढ संशयास्पद असल्याने सीबीआय सध्या या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. सीबीआयच्या तपासात केवळ अजय कुमार यांच्या मालमत्तेचीच नव्हे तर त्यांच्या आर्थिक व्यवहारांची आणि कुटुंबियांच्या भूमिकेचीही तपासणी करण्यात आली आहे. अजय कुमार हे आपल्या उत्पन्नाच्या ज्ञात स्त्रोतांपेक्षा अधिक मालमत्तेबाबत समाधानकारक हिशेब सादर करण्यात अयशस्वी ठरले आहेत, असा सीबीआयचा आरोप आहे. सीबीआयने या प्रकरणी अजय कुमार याची पत्नी आणि आईलाही सहआरोपी बनवले आहे. या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अजय कुमार यांच्या १ जानेवारी २०१४ ते १३ जून २०२४ या सुमारे दहा वर्षांच्या कालावधीतील मालमत्तेची सीबीआयने तपासणी केली. तपासाच्या सुरुवातीला त्यांची एकूण मालमत्ता अंदाजे ५२ हजार ४२८ रुपये होती. दहा वर्षांत त्यात मोठी वाढ होत मालमत्ता ५ कोटी ५९ हजार रुपये झाली.

ठाणे महानगरपालिका, ठाणे
पाणी पुरवठा विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील पाणी देयके वसुलीसाठी अतिरिक्त कनिष्ठ अभियंते व कर्मचारी वर्ग आऊट सोर्सिंगद्वारे घेणे कामी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदाराविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदनी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदाराना निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्रे ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर दि.०६/०७/२०२६ रोजी दुपारी १६.०० पासून दि.१५/०७/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. दि. १५/०७/२०२६ रोजी पर्यंत सांय. १६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. १५/०७/२०२६ रोजी सांय. १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु-मु/२७४/२०२६-२७ सही/-
दि:०३.०७.२०२६ नगरअभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## गोव्याच्या वीज वितरणावर टाटा पॉवर कंपनीची नजर

■ पणजी

टाटा पॉवरने संपूर्ण गोव्यामध्ये वीज वितरणासाठी संयुक्त वीज नियामक आयोगाकडे अधिकृत परवान्यासाठी अर्ज केला. हा परवाना मिळाल्यास गोव्यातील सरकारी वीज महामंडळाची मक्तेदारी संपून खासगीकरण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ४ जून रोजी गुरुग्राम येथे आयोगाने जारी केलेल्या अंतरिम आदेशात 'विद्युत कायदा, २००३' च्या कलम १४ आणि १५ अन्वये संपूर्ण राज्यासाठी वितरण परवाना मिळवण्याबाबत टाटा पॉवरने दाखल केलेल्या याचिकेची नोंद घेण्यात आली आहे. आयोगाने टाटा पॉवरच्या काही त्रुटींवर आक्षेप घेऊन त्यांना आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी ४ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती. आवश्यक पूर्तता झाल्यानंतरच अर्जाचा अधिकृतपणे विचार केला जाऊ शकतो.

मंजुरी मिळाल्यास, टाटा पॉवर गोव्यामध्ये परवानाधारक वीज वितरण कंपनी म्हणून कामकाज सुरू करेल. सध्या गोवा वीज विभाग ही एकमेव परवानाधारक संस्था आहे आणि त्यांना थेट स्पर्धेचा किंवा विस्थापनाचा सामना करावा लागू शकतो. या प्रस्तावाला गोवा सरकारची संमती आणि आयोगाची मंजुरी मिळणे अजून बाकी आहे. या प्रक्रियेत जनसुनावणी आणि नियामक छाननी यांचा समावेश असेल, ज्यामुळे ही प्रक्रिया दीर्घकालीन आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील ठरू शकते. टाटा पॉवर ही वीज निर्मिती आणि वितरण या दोन्ही क्षेत्रांतील एक नामांकित कंपनी आहे.

## शेतातून जाताना विजेच्या धक्क्याने वृद्धेचा मृत्यू

**सांगली** -जत तालुक्यातील सिंगनहळ्ळी येथे वृद्ध महिलेचा शेतालगतच्या खांबातून विजेचा जोरदार धक्का बसल्याने मृत्यू झाला. रत्नाबाई दासू कांबळे (६५) असे मृत महिलेचे नाव आहे. रत्नाबाई कांबळे या काल शनिवारी ओढ्यालगतच्या शेतात चालत जात होत्या. त्यावेळी त्यांनी वाटेवरील विद्युत खांबाला हात लावताच त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. हे लक्षात येताच मुलगा जनार्दन दासू कांबळे याने त्यांना तातडीने बाजूला करून जत ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

निविदा सूचना

**नॅशनल लायब्ररी वांद्रे ही संस्था पहिल्या मजल्यावरील पुस्तक व आसन व्यवस्था यांच्या फर्निचर कामासाठी निविदा मागवित आहे. कामाचा तपशील संस्थेच्या कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार सकाळी ८.३० ते सायं. ७.३० पर्यंत मिळेल तरी इच्छुक कंत्राटदारांनी शनिवार दि. ११ जुलै २०२६ पर्यंत सकाळी ११.३० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत. दुरध्वनी क्र. ७९७७९३०७३४.**

श्री. विद्याधर झारापकर
प्रमुख कार्यवाह,
नॅशनल लायब्ररी, वांद्रे, एस. व्ही. रोड, मुंबई – ४०००५०.
बीवायपी

महावितरण
ई-निविदा सूचना

महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून कोल्हापूर मंडल कार्यालय अंतर्गत ई-निविदाद्वारे खालीलप्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | तपशील | निविदा रक्कम (लाखात) | निविदा किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | SE/KC/Tech/DT BOX REP/T-09/2026-27 | Repairing and Maintenance (Reconditioning) work of Three Phase Transformer Distribution Boxes of various capacities at site and its allied works on "Turnkey Basis" under Kolhapur R-I, Kolhapur R-II & Gadhinglaj, Division Kolhapur Circle. | रु. ९०.०० | रु. ५०००/- + १८% GST | रु. ९०,०००/- |

महावितरण ई-निविदा https://www.mahadiscom.in/etender: या संकेतस्थळावर बिड कागदपत्रांची उपलब्धतेची तारीख ०६.०७.२०२६(०९:००) व निविदा भरण्याची अंतिम तारीख १७.०७.२०२६(२३:५०). संपर्क क्र.७८७५७६९०९६

KOPZ PRO No. - PRO/KOPZ/104/2026-27 अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर

## भुसावळ शहरात रेल्वे कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या

**भुसावळ** -शहरातील रेल्वेच्या कवाडे नगर परिसरातील जलशुद्धीकरण केंद्र अर्थात फिल्टर हाऊस परिसरात कर्तव्यावर असलेल्या एका रेल्वे कर्मचाऱ्याचा डोक्यात लोखंडी रॉडने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. प्रसाद यशवंत कुलकर्णी (५८) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)
बेस्ट उपक्रमास पाहिजेत
बस वाहक - ३६४ पदे
व
प्रतीक्षा यादी तयार करण्याकरिता
सदर पदासाठी आवश्यक वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा नमुना व इतर तपशीलाबाबतची माहिती
www.bestundertaking.com
या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
अर्ज दिनांक ०८/०७/२०२६ पासून संकेतस्थळावर उपलब्ध होतील.
जसंअ/मुव्य (मा.सं व औ.स)/४१/२०२६ महाव्यवस्थापक

महावितरण
ई-निविदा सूचना

पात्र निविदाकारांकडून मायक्रोसॉफ्ट ३६५ ऑफिस सूट सोल्यूशन (M365) दोन (२) वर्षांच्या कालावधीसाठी खरेदी करण्याबाबत महावितरणतर्फे, ऑनलाइन निविदा मागविण्यात येत आहेत. संक्षिप्त कामाची व्याप्ती, पात्रता निकष, निविदापूर्व बैठक, VC लिंक, इत्यादी माहिती www.mahadiscom.in येथे 'निविदा सूचना' मध्ये उपलब्ध आहे. निविदापूर्व बैठक १०-०७-२०२६ रोजी १५.०० वाजता (VC https://meet.google.com/wmn-dysh-xro वर) होईल तरी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १७.०७.२०२६ रोजी १७.३० वाजेपर्यंत असेल .निविदापूर्व शंका msofficerfp@mahadiscom.in वर १०.०७.२०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. संपूर्ण निविदा (Tender Document) महावितरणच्या ई-निविदा संकेत स्थळावर https://etender.mahadiscom.in वर उपलब्ध आहे.

निविदा क्र. CGM-IT/M365/2026-27/002
निविदा शुल्क : ₹ ११,८००/-(GST सह)
इसारा रक्कम : ₹ ८,२०,३१४/-
HOPR: 157/26 dt.3.07.26

मुख्य महाव्यवस्थापक (मा. तं.),
महावितरण, प्रकाशगड , ४था माळा,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पूर्व मुंबई – ५१
ई-मेल: msofficerfp@mahadiscom.in

कुळगांव बदलापूर नगरपरिषद
नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन(पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेलः- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- kbmc.gov.in

जा.क्र : कुबनप/नगरोत्थान/साबां/३२३/२०२६-२७ दिनांक : ०३/०७/२०२६

**जाहिर ई - निविदा सुचना क्र. २४/२०२६-२७**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०३ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०६/०७/२०२६ ते दि. १३/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि. ०८/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि. १४/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## 'अल्फा'मध्ये दिया मिर्झाची एंट्री



**आलिया भट्ट** आणि शर्वरी वाघ यांची मुख्य भूमिका असलेल्या बहुप्रतिक्षित 'अल्फा' या चित्रपटाबाबत चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता आहे. या चित्रपटाबाबत आता एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी माहिती समोर आली आहे. अभिनेत्री दिया मिर्झा या चित्रपटात एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि विशेष भूमिकेत (स्पेशल अपिअरन्स) दिसणार आहे. 'यशराज फिल्म्स'च्या या महत्त्वाकांक्षी स्पाय युनिव्हर्स चित्रपटात तिची भूमिका कथेला एक वेगळे वळण देणारी ठरणार आहे.

दियाने या चित्रपटातील तिच्या भागाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. जरी तिची भूमिका पडद्यावर मर्यादित काळासाठी असली, तरी ती संपूर्ण चित्रपटाच्या कथेच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक आणि महत्त्वाची आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी यांच्या पात्रांच्या प्रवासाला गती देण्यामध्ये तिची भूमिका मोलाचा वाटा उचलणार आहे. दिया मिर्झाचा या स्पाय युनिव्हर्समधील प्रवेश चित्रपटाची भव्यता आणखी वाढवणारा ठरेल. 'यशराज फिल्म्स'ने या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी अत्यंत भव्य नियोजन केले असून, जगभरातील चित्रपटगृहांमध्ये जवळपास ९,००० हून अधिक शोच्या माध्यमातून हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आणण्याची तयारी सुरू आहे. दिया मिर्झाच्या या विशेष भूमिकेच्या बातमीमुळे आता चाहत्यांमधील या चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखी वाढली आहे.

## 'दिलावर' येणार दिवाळीत



**सैफ अली** खानचा मुलगा इब्राहिम अली खान याच्या आगामी 'दिलावर' (दलेर) या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. 'मॅडॉक फिल्म्स' या निर्मिती संस्थेने या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी एक संभाव्य कालावधी निश्चित केला असून, हा चित्रपट नोव्हेंबर २०२६ मध्ये दिवाळीच्या मुहूर्तावर चित्रपटगृहात प्रदर्शित करण्याचे नियोजन सुरू आहे.

इब्राहिम अली खानच्या कारकिर्दीसाठी हा चित्रपट अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कारण मुख्य अभिनेता म्हणून त्याचा हा पहिलाच चित्रपट असेल जो थेट चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी त्याचे 'नादानियां' आणि 'सरजमीन' हे प्रकल्प थेट डिजिटल प्लॅटफॉर्मवर (ओटीटी) प्रदर्शित झाले होते. 'दिलावर' या चित्रपटाचे दिग्दर्शन कुणाल देशमुख यांनी आहे. लंडन, मुंबई आणि चंदिगढ या ठिकाणी या चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून, इब्राहिम यामध्ये एका मॅरेथॉन धावपटूची भूमिका साकारत आहे.

## अक्षय आणि प्रियदर्शनचा 'विक्ड सनी'



**बॉलिवूडचा** ॲक्शन आणि कॉमेडी स्टार अक्षय कुमार आणि दिग्गज दिग्दर्शक प्रियदर्शन ही सिनेसृष्टीतील एक अत्यंत यशस्वी जोडी मानली जाते. 'हेरा फेरी', 'गरम मसाला', 'भागम भाग' आणि 'भूल भुलैया' यांसारखे एकापेक्षा एक ब्लॉकबस्टर चित्रपट देणारी ही जोडी तब्बल १४ वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र येत आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाबाबत आता एक मोठी आणि विशेष माहिती समोर आली असून, या चित्रपटाचे शीर्षक 'विक्ड सनी' असे निश्चित करण्यात आले आहे.

या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये आणि चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. अक्षय कुमार आणि प्रियदर्शन यांनी शेवटचा 'खट्टा मिठा' (२०१०) हा चित्रपट एकत्र केला होता. त्यानंतर आता प्रदीर्घ कालावधीनंतर हे दोन दिग्गज एकत्र येत असल्याने चित्रपटसृष्टीत आणि व्यापार विश्लेषकांमध्ये या चित्रपटाकडून खूप मोठ्या अपेक्षा आहेत.

## १५ वर्षांनंतर सेलिनाचे पुनरागमन



**अभिनेत्री** सेलिना जेटली तब्बल १५ वर्षांनंतर एका मुख्य भूमिकेद्वारे मोठ्या पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाली आहे. समाजसुधारक आणि स्वामी विवेकानंद यांच्या परमशिष्या 'सिस्टर निवेदिता' यांच्या जीवनावर आधारित एका महत्त्वपूर्ण बायोपिकमध्ये सेलिना मुख्य भूमिका साकारणार आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक राम कमल मुखर्जी या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून, ही भूमिका आपल्या कारकिर्दीतील अत्यंत अर्थपूर्ण आणि अद्वितीय अनुभव असल्याचे सेलिनाने म्हटले आहे. या चित्रपटाविषयी बोलताना सेलिनाने सांगितले की, राम कमल मुखर्जी यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या दिग्दर्शकासोबत काम करणे हा एक वेगळाच अनुभव आहे. सिस्टर निवेदिता यांची भूमिका साकारणे म्हणजे एका आंतरिक हाकेला ओढ देण्यासारखे आहे, अशी भावना तिने व्यक्त केली. सध्या या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.


## 'इंग्लिश, ऑगस्ट' नव्या ४के रूपात



**भारतीय** चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि मैलाचा दगड ठरलेला 'इंग्लिश, ऑगस्ट' हा चित्रपट तब्बल ३१ वर्षांनंतर एका नव्या आणि आधुनिक रूपात जागतिक व्यासपीठावर परतत आहे. १९९४ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची डिजिटल पद्धतीने पुनर्रचना करण्यात आली असून, आता तो अत्याधुनिक ४-के तंत्रज्ञानामध्ये परावर्तित करण्यात आला आहे. आगामी ८३व्या व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील अत्यंत प्रतिष्ठित अशा 'व्हेनिस क्लासिक्स कॉम्पिटिशन' या विभागात या चित्रपटाचा 'वर्ल्ड प्रीमियर' म्हणजेच जागतिक स्तरावर पहिला खेळ होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. भारतातील जुन्या आणि दुर्मीळ चित्रपटांचे जतन करणाऱ्या 'फिल्म हेरिटेज फाऊंडेशन' या नफा न कमावणाऱ्या संस्थेने या चित्रपटाची पुनर्रचना करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

जागतिक पातळीवर व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये आपल्या पुनर्रचित चित्रपटांचा जागतिक प्रीमियर प्रदर्शित करण्याची या संस्थेला सलग तिसऱ्या वर्षी संधी मिळाली आहे. यापूर्वी सन २०२४ मध्ये गिरीश कासारवल्ली दिग्दर्शित 'घटश्राद्ध' आणि सन २०२५ मध्ये बिमल रॉय यांच्या 'दो बिघा जमीन' या अजरामर चित्रपटांच्या पुनर्रचित आवृत्त्यांचे जागतिक प्रीमियर व्हेनिसमध्ये सादर झाले होते.

## 'मातृभूमी'बाबत अफवांचे खंडन



**अभिनेता** सलमान खान याच्या आगामी 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटाच्या सेन्सॉर प्रमाणपत्राबाबत समाजमाध्यमांवर सुरू असलेल्या उलटसुलट चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने या चित्रपटाचे प्रमाणपत्र रोखून धरले असल्याच्या बातम्या पूर्णपणे खोट्या आणि कपोलकल्पित असल्याचे सलमान खान फिल्म्स या निर्मिती संस्थेने अधिकृतपणे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात संस्थेने एक प्रसिद्धीपत्रक जारी करून अधिकृत बाजू मांडली आहे. गेल्या काही दिवसांपासून 'सीबीएफसी'ने काही कारणांमुळे या चित्रपटाचे प्रमाणपत्र पुढील आदेशापर्यंत राखून ठेवले असून, त्यामुळे चित्रपटाच्या प्रदर्शनाला विलंब होऊ शकतो, असा दावा काही प्रसारमाध्यमांनी केला होता. हा चित्रपट ऑगस्ट महिन्यातील स्वातंत्र्यदिनाच्या आठवड्यात प्रदर्शित होण्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी निर्मिती संस्थेने अद्याप नव्या प्रदर्शन तारखेची कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.

# हेल्दी Me

## समस्या व्हेरिकोसिलची





तरुण पुरुषांमध्ये व्हेरिकोसिल या आजाराचे प्रमाण वेगाने वाढत असून, यामुळे पुरुषांमधील वंध्यत्वाचा धोका गंभीर बनत चालला आहे.

वंध्यत्वाच्या समस्येसाठी तपासणी करून घेणाऱ्या पुरुषांपैकी तब्बल २० ते २५ टक्के पुरुषांमध्ये हा आजार आढळून येत आहे. अंडकोषातील (स्क्रोटम) शिरा फुगणे आणि तिथे रक्त साठून राहणे म्हणजेच व्हेरिकोसिल होय. पायांमध्ये दिसणाऱ्या व्हेरिकोज व्हेन्सप्रमाणेच ही समस्या असते, जी प्रामुख्याने डाव्या बाजूला उद्भवते.

तज्ज्ञांच्या मते, अंडकोषातील शिरांच्या झडपा खराब झाल्यामुळे रक्ताचा प्रवाह सुरळीत होत नाही आणि रक्त तिथेच साठू लागते. सुरुवातीला याची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. परंतु हळूहळू अंडकोषात जडपणा जाणवणे, मंद वेदना होणे किंवा जास्त वेळ उभे राहिल्यास अथवा शारीरिक कष्टाचे काम केल्यास त्रास वाढणे, अशी लक्षणे दिसतात. गंभीर स्थितीत या शिरा डोळ्यांनीही स्पष्ट दिसतात.

व्हेरिकोसिलचा सर्वात मोठा फटका पुरुषांच्या प्रजनन क्षमतेवर बसतो. अंडकोषात रक्त साठून राहिल्यामुळे तिथले तापमान वाढते, जे शुक्राणूंच्या (स्पर्म) निर्मितीसाठी अत्यंत घातक असते. यामुळे शुक्राणूंची संख्या कमी होणे, त्यांची हालचाल मंदावणे आणि त्यांचा आकार बिघडणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. काही रुग्णांमध्ये यामुळे अंडकोषाचा आकार लहान होतो आणि संप्रेरकांचे संतुलनही बिघडते. याचा थेट परिणाम नैसर्गिकरित्या मूल होण्याच्या क्षमतेवर होतो. तसेच आयव्हीएफसारख्या उपचार पद्धतींच्या यशाचे प्रमाणही यामुळे कमी होऊ शकते. वंध्यत्वाचे निदान करतानाच अनेक पुरुषांना या आजाराविषयी पहिल्यांदा समजते.

या आजाराचे अचूक निदान करण्यासाठी शारीरिक तपासणीसोबतच

## पार्किन्सनची लक्षणे ओळखा

**पार्किन्सन** आजार हा मेंदूच्या मज्जासंस्थेशी संबंधित एक हळूहळू वाढणारा गंभीर आजार आहे. मेंदूतील डोपामाईन नावाच्या रसायनाची निर्मिती करणाऱ्या पेशी नष्ट झाल्यामुळे शरीराच्या हालचालींवरून नियंत्रण सुटू लागते. या आजाराचे वेळेवर निदान होण्यासाठी त्याची सुरुवातीची लक्षणे ओळखणे आणि योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

------------

**पार्किन्सन** आजाराची सुरुवातीची मुख्य लक्षणे अत्यंत संथ गतीने समोर येतात. विश्रांती घेत असताना किंवा शांत बसले असताना अचानक हाताची बोटे, हात किंवा पायांना हादरे बसणे हे या आजाराचे सर्वात प्राथमिक आणि स्पष्ट लक्षण आहे. अनेकदा अंगठा आणि बोटांमध्ये विशिष्ट प्रकारची हालचाल दिसून येते. यासोबतच दैनंदिन साधी कामे करण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ लागतो, चालताना पावलांची गती कमी होते आणि पावले जमिनीला घासून चालल्यासारखी वाटतात. खुर्चीवरून उठणे किंवा अंथरुणातून कुशी बदलणेही अवघड वाटू लागते.

हात आणि पायांचे स्नायू ताठ किंवा कडक होतात, ज्यामुळे सांध्यांच्या हालचालींवर मर्यादा येतात आणि वेदना जाणवू शकतात. उभे राहताना किंवा चालताना शरीराचा तोल सांभाळणे कठीण होते, ज्यामुळे रुग्ण पुढे झुकल्यासारखा दिसतो आणि पडण्याची भीती वाढते. इतर लहान बदलांमध्ये आवाज खूप हळू किंवा अस्पष्ट होणे, चेहऱ्यावरील हावभाव नाहीसे होऊन चेहरा गंभीर दिसणे आणि हस्ताक्षराचा आकार हळूहळू खूप लहान होत जाणे यांचा समावेश होतो. हा आजार पाच टप्प्यांमध्ये विभागला जातो. पहिल्या टप्प्यात लक्षणे अत्यंत सौम्य असतात आणि ती शरीराच्या केवळ एकाच बाजूला जाणवतात. दुसऱ्या टप्प्यात लक्षणे शरीराच्या दोन्ही बाजूंना जाणवू लागतात आणि स्नायूंचा कडकपणा वाढतो. परंतु रुग्ण स्वतःची कामे स्वतः करू शकतो. तिसऱ्या टप्प्यात हालचाली खूप मंदावतात, शरीराचा तोल बिघडण्यास सुरुवात होते आणि दैनंदिन कामांसाठी काही प्रमाणात मदतीची गरज भासू लागते.

चौथ्या टप्प्यात लक्षणे अत्यंत तीव्र होतात. रुग्ण उभा राहू शकतो. परंतु चालण्यासाठी वॉकर किंवा इतर कोणाच्या तरी आधाराची तीव्र गरज असते.



## फायब्रोमायल्जिया गुंतागुंतीचा विकार



**फायब्रोमायल्जिया** हा एक अत्यंत गुंतागुंतीचा आणि जुनाट वेदनांचा विकार आहे. यामध्ये संपूर्ण शरीरातील स्नायू आणि हाडांमध्ये तीव्र वेदना जाणवतात. जागतिक स्तरावर सुमारे दोन ते आठ टक्के लोकसंख्या या आजाराने ग्रस्त असून, पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये याचे प्रमाण लक्षणीयरित्या जास्त आढळते.

या विकाराचे नेमके कारण अजूनही पूर्णपणे स्पष्ट झालेले नसले तरी, मध्यवर्ती मज्जासंस्थेमधील दोष आणि मेंदूची वेदनांचे संकेत स्वीकारण्याची बदललेली पद्धत यासाठी कारणीभूत मानली जाते. या स्थितीला वैद्यकीय परिभाषेत सेंट्रलाईज्ड पेन सिंड्रोम किंवा नोसिप्लास्टिक पेन असे म्हटले जाते. यामध्ये शरीरात कोणतीही प्रत्यक्ष ऊतींची हानी किंवा सूज नसतानाही मेंदू अत्यंत तीव्र वेदनांची अनुभूती देतो.

फायब्रोमायल्जियाच्या लक्षणांमध्ये केवळ शरीराचा सार्वत्रिक दाह आणि वेदना एवढेच समाविष्ट नसून, रुग्णाला प्रचंड थकवा जाणवणे, झोप पूर्ण न होणे किंवा सकाळी उठल्यावर ताजेतवाने न वाटणे अशा समस्यांचा सामना करावा लागतो. याशिवाय अनेक रुग्णांमध्ये स्मृतीशी संबंधित अडचणी, एकाग्रतेचा अभाव आणि मानसिक संभ्रमावस्था दिसून येते. याला वैद्यकीय भाषेत 'फायब्रो-फॉग' असे संबोधले जाते. या शारीरिक त्रासामुळे रुग्णांमध्ये नैराश्य आणि चिंतेचे प्रमाणही वाढते. हा आजार ओळखण्यासाठी कोणतीही विशिष्ट रक्त चाचणी किंवा क्ष-किरण (एक्स-रे) तपासणी उपलब्ध नसल्यामुळे, याचा अचूक आणि वेळेत निदान करणे हे वैद्यकीय क्षेत्रासाठी एक मोठे आव्हान ठरते. अमेरिकन कॉलेज ऑफ रूमेटॉलॉजीच्या सुधारित निकषांनुसार, जर एखाद्या रुग्णाला शरीराच्या विविध भागांमध्ये सलग तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ तीव्र वेदना जाणवत असतील आणि सोबतच थकवा व झोपेच्या विकारांची तीव्रता जास्त असेल, तर क्लिनिकल मूल्यांकनाद्वारे याचे निदान केले जाते. या प्रक्रियेत इतर संधिवातसदृश आजारांची शक्यता पूर्णपणे तपासून पाहिली जाते. अलीकडील वैद्यकीय संशोधनानुसार, शरीरातील न्यूरोइन्फ्लेमेशन (मज्जासंस्थेची सूज) आणि आतड्यांमधील सूक्ष्मजीवरचनेतील बदल यांचाही या आजाराच्या तीव्रतेशी थेट संबंध असल्याचे समोर येत आहे. फायब्रोमायल्जियाच्या व्यवस्थापनासाठी बहुआयामी आणि वैयक्तिकृत उपचार पद्धतीचा अवलंब करावा लागतो. कारण केवळ वेदनाशामक औषधांचा यावर फारसा परिणाम होत नाही.

उपचारांमध्ये औषधांसोबतच जीवनशैलीतील बदल अत्यंत महत्त्वाचे ठरतात. यामध्ये सौम्य व्यायाम, योगासने, पुरेशी आणि नियमित झोप, मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन आणि कॉग्निटिव्ह बिहेव्हिरल थेरपी यासारख्या उपायांना प्रथम प्राधान्य दिले जाते. रुग्णाला या आजाराचे स्वरूप समजावून सांगणे आणि त्यांच्या अपेक्षांचे योग्य व्यवस्थापन करणे हाच या गुंतागुंतीच्या विकारावर मात करण्याचा मुख्य मार्ग आहे.

## क्रॅम्प्स टाळण्यासाठी...



**उन्हाळ्याच्या** दिवसांत तीव्र उष्णतेमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन स्नायू आकसणे म्हणजेच क्रॅम्प्स येण्याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढते. याची कारणे बरेचदा आपल्या चुकांमध्ये दडलेली असतात.

उन्हाळ्यात घामाच्यावाटे शरीरातील पाणी वेगाने बाहेर पडते. अशावेळी पुरेशा प्रमाणात पाणी न प्यायल्यास स्नायूंच्या पेशी आकुंचन पावतात आणि तीव्र वेदना सुरू होतात. यावर उपाय म्हणून दिवसभरात कमीत कमी तीन ते चार लीटर पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे.


दुसरी चूक शरीरातील ईलेक्ट्रोलाइट्सच्या पातळीकडे दुर्लक्ष करणे ही आहे. घामाद्वारे केवळ पाणीच नाही, तर सोडियम आणि पोटॅशियमसारखी अत्यंत आवश्यक खनिजेही शरीरातून बाहेर पडतात. या खनिजांच्या कमतरतेमुळे स्नायूंचे नियंत्रण बिघडते आणि क्रॅम्प्स येतात. म्हणूनच केवळ साधे पाणी पिण्याऐवजी आहारात लिंबू पाणी, ओआरएसचे द्रावण, नारळ पाणी किंवा ताक यांचा समावेश करावा, ज्यामुळे शरीराला नैसर्गिकरित्या ईलेक्ट्रोलाइट्स मिळतात.

तिसरी चूक म्हणजे कडक उन्हात अचानक जड शारीरिक व्यायाम किंवा कष्टाचे काम करणे. शरीराचे तापमान आधीच वाढलेले असताना थेट सूर्यप्रकाशात किंवा जास्त उष्णतेच्या ठिकाणी व्यायाम केल्यास स्नायूंवर अतिरिक्त ताण पडतो. यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांत व्यायामाची वेळ बदलून ती पहाटे किंवा संध्याकाळी करावी आणि व्यायाम सुरू करण्यापूर्वी तसेच नंतर शरीराला पुरेशी विश्रांती द्यावी.

चौथी चूक आहारात पौष्टिक घटकांचा अभाव असणे ही आहे. स्नायूंच्या योग्य हालचालींसाठी कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि आवश्यक जीवनसत्त्वे खूप महत्त्वाची असतात. उन्हाळ्यात भूक कमी लागल्यामुळे अनेकदा लोक हलका किंवा अपुरा आहार घेतात. यामुळे स्नायू कमकुवत होतात. या समस्येपासून वाचण्यासाठी हिरव्या पालेभाज्या, केळी, सुका मेवा आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन वाढवणे फायदेशीर ठरते. पाचवी चूक म्हणजे क्रॅम्प्स आल्यानंतर त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे किंवा चुकीच्या पद्धतीने मालिश करणे. स्नायू आकसल्यावर तिथे अचानक तीव्र दाब दिल्यास किंवा चुकीच्या दिशेने ओढल्यास अंतर्गत ऊतींना दुखापत होऊ शकते. वारंवार क्रॅम्प्स येत असतील, तर ते शरीरातील गंभीर अशक्तपणाचे किंवा मज्जासंस्थेच्या समस्येचे लक्षण असू शकते. अशा वेळी स्ट्रेचिंग आणि बर्फाने शेकणे फायदेशीर ठरते. त्रास जास्त असल्यास डॉक्टरांचा योग्य सल्ला सल्ला घेणे अत्यंत गरजेचे असते.

सिमंधर महानारायण वात बाम
एक प्रभावी उपाय
अकड़न कंबर दुखी
सांधे दुखी पाठ दुखी
To Order Scan Here
Simandhar
HELPLINE NO .: 7045355632

# नवाकाळ शब्दकोडे-१६५८



**आडवे शब्द –**

२. कोसळलेले, भुईसपाट ५. आवेश, आविर्भाव ८. बेसन व इतर पदार्थ वापरून केलेला लोकप्रिय तळीव पदार्थ ९. शर्त ११. हातापायांची आगआग होणारा विकार, विपादिका १३. त्वचेचा रंग १४. पाकातील बंगाली मिठाई १६. सोने १७. खानदानी, घरंदाज १८. नेत्र, लोचन २०. ताकद २१. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बांधलेला हौद किंवा कृत्रिम विहीर २२. प्रवाह, लोंढा २४. तरतरी आणणारे घरगुती पेय २५. बुरशी २६. माळजमीन २७. करंगळीनजीकचे बोट ३०. कमीत कमी ३२. आरोळी ३३. दमदाटी ३६. गोंगाट ४०. राख ४२. कुटील खेळी ४३. आश्चर्य ४४. कमी वेळात ४६. बोध, समज ४७. बहरणे, फुलणे ४९. हरणाचे पिल्लू ५१. वायस ५३. विनयी, नम्र ५४. गणपती ५६. भाबडा, निरागस ५७. याग, यज्ञ ५९. झाडाचा बुंधा ६०. अंत:करणातली अस्वस्थता ६२. पाच पेंढ्यांची जुडी ६४. पांढरा ६७. सुगंध ७०. वेग ७१. वार्ता, बातमी ७३. कापसाचे बी ७४. देवांचा राजा ७५. शैली ७८. ध्वनिवर्धक, भोंगा ७९. जेवण ८१. कच खाणे, अडखळणे ८४. भुंग्याची गुणगुण ८६. दयेचा सागर, परमेश्वर ८९. खाणीतला मौल्यवान दगड ९०. चपळ व छोटा प्राणी, चानी ९१. दरवाजा ९३. शिखर ९५. पूर्ण पोशाख ९८. अनिवार्य, टाळता न येणारे ९९. पार्वती १००. साद १०२. पोपट १०३. चाकू, मदिरा १०४. प्रश्न १०६. बाधा, संसर्ग १०८. बंदुकीची दारू, मोठा आवाज १०९. नमुना, वानगी १११. पुष्कळ, चिक्कार ११२. भौमवासर ११३. खट्याळ

**उभे शब्द –**

१. फळीचा वेडावाकडा तुकडा २. जपणूक ३. प्रणाम, वंदन ४. स्तुती करणारे काव्य, स्तोत्र ६. अनासक्ती, वैराग्य ७. पीडा ८. एक औषधी वनस्पती, बिब्बा ९. निरंतर, सतत १०. एकाग्र नजर १२. बाजू घेणारा १५. महादेवाचे पुजारी १६. सळईवर भाजलेले खमंग पदार्थ १९. जेव्हा २०. संशयाचे निराकरण २२. साष्टांग नमस्कार २३. यज्ञातील पवित्र इंधन २५. सुगंधी फुलांचे एक झाड २७. मुघल-ए-आझममध्ये सलीमची प्रेयसी २८. बत्ती, वात २९. ठोक, मार ३१. मशाल, दिवटी ३४. गमावणे, हातचे घालवणे ३५. जाड रेशमी कापड ३७. ढोंगी, ठक, फसव्या ३८. पृष्ठभागाचा तुकडा ३९. कमी प्रमाणात ४१. धुणे, मार्जन ४५. अतिशय कंजूष ४८. अंकित, अधीन ५०. आसपास ५२. कांचन, सुवर्ण ५४. गायब, दिसेनासा ५५. रानात पसरलेली आग, वणवा ५८. सुगंधी वाळा ६०. शिंपल्यात राहणारा प्राणी ६१. धांदल, घाई ६२. दाराची, खिडकीची एक बाजू ६३. दरवाजा ६५. फेन, बुडबुडे ६६. दार ६८. प्रथा, प्रघात ६९. सिंहासन, तख्त ७२. रायगडावरचा प्रसिद्ध कडा ७६. बाजू, कैवार ७७. एक सुगंधी फूल ७९. बेशुद्धी, घेरी ८०. पान ८२. मोठेपणा, थोरवी ८३. कोणाच्या अध्यातमध्यात नसलेला ८४. समाजकंटक ८५. जिनसांची यादी ८७. प्रवास, तीर्थाटन ८८. उणे, कमी ९०. पलंग ९२. पुन्हा पुन्हा ९४. आयुर्वेदिक औषधाची मात्रा उगाळण्याचा दगड ९६. वानवा, पंचाईत ९७. घर, सदन ९८. निर्नायकी, सावळागोंधळ १०१. दक्षिणेचा निसर्गरम्य प्रांत १०५. खांबावर आडवी टाकलेली तुळई १०७. रमलेला, तल्लीन १०८. उपवन, उद्यान ११०. लक्षावधी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६५७ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. हवालदिल ५. संधान ७. सखा ९. महसूल १२. जल्लीकट्टू २३. चांगदेव १४. बाकबूक १६. तोड १७. शपथ १८. टोकदार २०. पन्हाळगड २३. हरकारा २५. साजरा २७. जगावेगळा २९. वाळू ३०. गोची ३१. पाल्व ३२. सद ३३. मोडी ३४. मयत ३५. कट्यार ३६. वाकी ३७. दर्प ३८. गल्का ४०. सेनानी ४१. कंथा ४२. चटकन ४४. हटके ४७. जप ४९. कमाल ५०. चिरीमिरी ५२. दारा ५३. पूल ५४. नकुल ५६. रहदारी ५८. वार ६०. परवशता ६१अ. कास्य ६२. सव्यसाची ६३. सरकारी ६५. सामोरी ६७. अमेय ६८. वीरू ७०. पाल ७२. गाज ७३. गंमत ७४. पारपटल ७६. हयगय ७८. कल्ला ७९. डाली ८०. जागा ८१. वर ८२. थक्क ८३. मकर ८५. मघा ८६. सई ८७. प्रतीक ८८. जीन ८९. टाक ९१. लगट ९२. मांजा ९३. लेक ९४. कर्ण ९५. कापा ९६. पाहुणे ९८. वाजी ९९. पहिला १०१. सच्चा १०२. रजत १०३. चळत १०४. राई १०५. अतीव १०६. दही १०७. ढिसाळ

**उभे शब्द :** १. हल्ली २. वाकसळ ३. लड्डू ४. लचांड ५. संदेश ६. धावपट्टू ७. सकवार ८. खाबू १०. हरदासाची कथा ११. लभ्य १२. जलपर्णी १५. कटोरा १६. तोडगा १९. रज २१. गजवदन २२. दगदग २३. हळू २४. कात्यायनी २६. रामरक्षा २८. वेस २९. वाडी ३१. पाकीटमार ३३. मोकाट ३४. मनाली ३६. वाचक ३९. लहरी ४१. कंप ४३. कलहकारी ४४. स्वारी ४६. केदार ४७. जलपरी ४८. अंकुश ५०. चिरी ५१. मितव्यय ५४. नवरा ५५. लताकुंज ५७. दास्य ५८. वाचीवीर ५९. द्वारपाल ६१. ठोसा ६२. समेत ६४. काल ६६. मोहल्ला ६७. अमली ६९. रूपवती ७१. क्रय ७२. गायक ७३. गंडा घालणे ७४. पागा ७५. टरकलेला ७६. हक्क ७७. गमन ७८. कपटा ८०. जाई ८२. थर ८४. रक्तपात ८६. सटवाई ८७. प्रजापती ८८. जीर्ण ९०. कपाळ ९४. कच्चा ९५. काजळ ९७. हुत १००. हिव १०१. सही १०२. रसा

पान १ वरून

इथे एका निष्पाप माणसाचा जीव गेला आहे, पण पालिका प्रशासन हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत आहे. दुर्घटना घडून चार तास झाले तरी अद्याप एकही अधिकारी फिरकलेला नाही. हे आम्ही खपवून घेणार नाही.

मनसे कार्यकर्त्यांच्या आंदोलनानंतर मुंबईच्या महापौर रितू तावडे या तिथे पोहोचल्या. त्यांनी मनसे कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्या म्हणाल्या की, ही दुर्दैवी घटना आहे. यामध्ये पालिका प्रशासनाला पाठीशी घालण्याचे किंवा पाठिंबा देण्याचे कारण नाही. एका वयोवृध्द व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. ते त्या ठिकाणी त्यांचे दुकान उघडण्यासाठी आलेले होते, अशी माहिती आहे, या ठिकाणी झाड डेंजर झोनमध्ये दिसत होते, तसे पत्र देण्यात आले होते. मात्र पालिका प्रशासनाने यामध्ये लक्ष घातले नाही. हा चौकशीचा भाग आहे. ती केली जाईल, पण अशा पद्धतीचे चित्र विरोधकांच्या माध्यमातून उभे केले जात आहे, की, सत्ताधारी किंवा महापौर कंत्राटदारांना पाठीशी घातले जात आहे. अशी वक्तव्ये करून ते मुंबईकरांची दिशाभूल करत असतील तर त्याचा मी निषेध करते.

## बीडीडी चाळ परिसरात झाड कोसळून तिघे जखमी

वरळीतील बीडीडी चाळ परिसरात मोठे झाड कोसळून तीन जण जखमी झाले. त्यासोबत अनेक उभ्या असलेल्या वाहनांचेही नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि रस्त्यावर झाड हटवण्याचे काम सुरू केले होते.

# झाडे कोसळून आणखी दोघांचा मृत्यू

दुसरी घटना आरे कॉलनी परिसरात घडली. चालत्या दुचाकीवर झाडाची मोठी फांदी कोसळून १८ वर्षीय हसन रझा जहांगीर आलम सय्यद या तरुणाचा मृत्यू झाला. हसन आपल्या मित्रांसोबत युनिट क्रमांक १३ परिसरातून जात असताना ही दुर्घटना घडली. गंभीर जखमी झालेल्या हसनला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तर त्याचा मित्र जखमी आहे.

गेले काही दिवस मुंबईत पडणाऱ्या पावसामुळे दुर्घटनांचे सत्र सुरू आहेत. ३० जून रोजी चेंबूरमधील ११ नंबर रोडवर शाळेच्या बसवर झाड पडून ११ वर्षीय विहान श्रीवास्तवचा मृत्यू झाला. त्यानंतर २ जुलैला साकीनाका परिसरातील खैरानी रोडवर उघड्या मॅनहोलमध्ये पडून ५५ वर्षी अस्लम शेख यांचा मृत्यू झाला. आज मुंबईत तब्बल ६४ ठिकाणी झाडे किंवा मोठ्या फांद्या कोसळल्याच्या घटना घडल्या. दादर परिसरात सात ठिकाणी झाडे कोसळली. सकाळी दादर परिसरात एका घराच्या छतावर झाड पडले. त्यामुळे छत तुटून फांदी घरात घुसली. शिवाजी पार्क येथील मीनाताई ठाकरे स्मारकाजवळ मोठे झाड पडून वाहनांचे नुकसान झाले. दादर स्थानकाशेजारी स्वामीनारायण मंदिर परिसरात झाड कोसळल्याने एक दुचाकीस्वार थोडक्यात बचावला. रानडे रोड, डिसिल्वा रोड आणि कॉसमॉस बँक परिसरातही झाडे पडल्याच्या घटना घडल्या. तर वांद्रे, घाटकोपर, विलेपार्ले, माहीम, चेंबूर, वडाळा, वाशी आणि नेरुळ परिसरातही झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या. या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पावसाळापूर्व तयारीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करूनही झाडांची छाटणी का झाली नाही? दुर्घटना घडूनही प्रशासन ढिम्म का? असे गंभीर प्रश्न पुन्हा उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, ठाण्यात किसननगर परिसरात इमारतीचा भाग कोसळून दोघे गंभीर जखमी झाले, तर मुंब्रा येथे शाळेची संरक्षक भिंत कोसळली. भिवंडीत मुसळधार पावसामुळे मुख्य बाजारपेठ असलेल्या तीनबत्ती परिसरात गुडघाभर पाणी साचले होते. ड्रेनेज लाईनमध्ये कचरा अडकल्याने पाण्याचा निचरा होत नव्हता. या पाण्यात उतरून स्पायडरमॅनचा पोशाख परिधान केलेल्या एका तरुणाने चांगलीच स्टंटबाजी केली. डोंबिवली-कल्याण परिसरात पाणी साचले होते. येथील उल्हास नदीची पातळी वाढली होती.

मुंबईत अंधेरी सबवे सलग पाचव्या दिवशी जलमय झाला. पश्चिम उपनगरांतील अनेक भागांत मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. वसई-विरारमध्ये मिठागर परिसर पाण्याखाली गेला होता. तर नालासोपारा पश्चिमेकडील सोसायट्यांमध्ये कमरेइतके पाणी साचले होते. रायगड जिल्ह्यात उरण, पनवेल आणि कर्जत परिसरात पूरस्थिती निर्माण होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला. वसई-विरार शहरात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पाच जणांचा मृत्यू झाला आहे. वसई पूर्वेतील वालीव येथे राहणारे किसन लोखंडे (५०) हे काल दुपारपासून बेपत्ता होते. चहा पिण्यासाठी घराबाहेर पडलेले लोखंडे नाल्यातील पुराच्या पाण्यात वाहून गेल्याचा अंदाज होता. त्यांचा मृतदेह वसई पूर्वेतील मधुबन परिसरात आढळला. नालासोपारा पूर्वेतील जीवननगर परिसरात पुराच्या पाण्यात वाहून आलेल्या एका अनोळखी इसमाचा काल रात्री मृतदेह सापडला. तर रविवारी नालासोपारा पश्चिमेतील गास येथील भाटोरी तलावात आणखी एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. या दोन्ही मृतदेहांची ओळख पटविण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, काल नालासोपारा पूर्वेतील संतोष भुवन परिसरात वेदांत सावंत (२०) या महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. श्री समर्थ चाळीत राहणाऱ्या वेदांतच्या घरातील पोटमाळ्यावर जाण्यासाठी असलेल्या लोखंडी शिडीत इन्व्हर्टरचा वीजप्रवाह उतरला होता. पावसामुळे शिडी ओली झाल्याने तिचा स्पर्श होताच त्याला जोरदार विजेचा धक्का बसला. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



माटुंगा येथे झाड कोसळून गाड्यांचे नुकसान



सायन



दादरमधील केटरिंग कॉलेजजवळ झाड कोसळले.

## महामुंबईत आज शाळांना सुट्टी

मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेऊन उद्या मुंबईसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, रत्नागिरी आणि रायगड येथील शाळा आणि कॉलेजला सुट्टी देण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यात शाळा आणि कॉलेजला सुट्टी दिली असेल तर ऑनलाईन शाळा घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## रील की रिअल स्टार? आजी-माजी महापौर पुन्हा वाद

मुंबईत मुसळधार पावसामुळे झाडे कोसळून आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाल्याने राजकारणही तापले. झाडांच्या दुर्घटनांवरून माजी महापौर किशोरी पेडणेकर आणि विद्यमान महापौर रितू तावडे यांच्यात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोप झाले. रील स्टार की रिअल स्टार, यावरून दोघींनी एकमेकांवर टीका केली. झाड दुर्घटनेवर किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, महापौरांनी जबाबदारी स्वीकारावी. तसेच झाडांच्या देखभालीतील निष्काळजीपणा आणि विकासकामांमुळे झाडांची मुळे कमकुवत झाली आहेत. रितू तावडे या केवळ रील स्टार आहेत. या टीकेला प्रत्युत्तर देताना महापौर रितू तावडे यांनी विरोधकांवर ते राजकारण करत असल्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या की, सर्व नियम माहिती असतानाही केवळ गलिच्छ राजकारणासाठी किशोरी पेडणेकर आणि सुषमा अंधारे यांनी टीका सुरू केली आहे. मला त्यांची घृणा वाटते. मी स्वत: मैदानात उतरले तर मला रील स्टार म्हणतात. मी रील स्टार आहे की रिअल स्टार, हे माझे मुंबईकर ठरवतील. अंधारे यांनी दुसऱ्यांवर टीका करण्यापूर्वी आपल्या दिव्याखाली काय अंधार आहे तो पाहावा. २५ वर्षांचा हिशेब आम्हाला काढता येईल.

# कोकण ते पश्चिम महाराष्ट्र अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती

■ रायगड

**राज्यात** सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईसह रायगड, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी पाणी साचणे, झाडे व दरडी कोसळणे आणि पूरस्थिती निर्माण झाली असून मुंबई, ठाणे आणि पालघरला रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यात मुंबई गोवा महामार्गावर सुकेळी खिंडीतील असणाऱ्या जिंदाल कंपनीजवळ कंबरभर पाणी साचल्यामुळे दोन्ही दिशेकडील हजारो वाहन अडकून पडली. कुंडलिका आणि पाताळगंगा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. रसायनी येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या एसटी बसमधील आठ प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली. कर्जत, पेण, रोहा, नागोठणे परिसरातही पूरस्थिती निर्माण झाली आहे. अंबा, कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास, या नद्यांनी धोक्याची आपली पातळी ओलांडली असून, त्यामुळे अनेक भागांत पाणी शिरले.

कोकणातील कणकवली, वैभववाडी, मालवण आणि सावंतवाडी परिसरात मुसळधार पावसासह जोरदार वारे वाहत होते. त्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. सावंतवाडी तालुक्यातील चौकुळ गावातील मऱ्हाटवाडी-बेरडकी येथे वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने चक्रीवादळासारखी स्थिती निर्माण झाली. या वादळाच्या तडाख्यात एका वृद्धाचे घर पूर्णपणे कोसळले. रत्नागिरीत जगबुडी नदीने धोकापातळी ओलांडली असून सिंधुदुर्ग आणि महाबळेश्वर परिसरातही वादळी पावसाचा जोर कायम आहे. कोल्हापूरमध्ये पंचगंगा नदीची पातळी वाढून २० बंधारे पाण्याखाली गेले आहेत, तर भुसावळ परिसरात हतनूर धरणातून मोठा विसर्ग सुरू आहे.



पुणे जिल्ह्यात जांभुळवाडी, कात्रज-कोंढवा, लोणावळा आणि भीमाशंकर परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. अनेक ठिकाणी भिंती कोसळल्या, झाडे पडली. त्यामुळे वाहनांचे नुकसान झाले आहे. तळेगाव परिसरात पाणीपुरवठा वाहिनी फुटल्याने रस्त्यावर मोठा फवारा उडत होता. तळेगाव परिसरात पाणीपुरवठा वाहिनी फुटल्याने रस्त्यावर मोठा फवारा उसळला. लोणावळ्यात नांगरगाव, भांगरवाडी, तुंगारली, रायवूड, दामोदर कॉलनी, वर्धमान सोसायटी इतर भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

# अमित साटम यांना मनसेकडून काळे झेंडे

■ मुंबई

**भाजपा** नेते अमित साटम यांच्या कथित व्हिडिओवरून निर्माण झालेल्या वादानंतर अंधेरीत मनसे कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले. तसेच भांडुपमध्ये साटम यांना काळे झेंडे दाखवले. विधिमंडळ परिसरातील एका दुर्घटनेवर साटम हसत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी साटम आणि भाजपावर टीका केली होती. त्यानंतर साटम यांनीही प्रत्युत्तर देत राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला होता. त्यामुळे वाद अधिकच चिघळला.

या पार्श्वभूमीवर अंधेरी स्थानकाबाहेर मनसे समर्थकांनी आंदोलन करत घोषणाबाजी करत अमित साटम यांच्या राजीनाम्याची मागणी केली. जोरदार पावसातही कार्यकर्ते ठिय्या देऊन आंदोलन करत होते. मनसे नेते मनीष धुरी यांच्या उपस्थितीत हे आंदोलन पार पडले. यावेळी आंदोलकांनी आगामी निवडणुकीत साटम यांना पराभूत करण्याचा इशारा दिला. आंदोलनादरम्यान पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले. तसेच भांडुप येथील डीएव्ही महाविद्यालयाबाहेरही मनसे कार्यकर्त्यांनी निदर्शने करत साटम यांना काळे झेंडे दाखवले आणि बॅनरला काळे फासून संताप व्यक्त केला.

# 'हाफकीन' महामंडळाचे खासगीकरण करणार

पान १ वरून

उभारण्याकरिता ही जमीन दिली होती. कालांतराने ही प्रयोगशाळा दुसरीकडे उभारून टाटाने हाफकीनच्या पाच एकर जागेवर त्यांच्या रुग्णालयातील डॉक्टरांसाठी निवास इमारती उभारल्या आहेत.

समाजवादी पक्षाचे रईस शेख यांनी हाफकीनच्या खासगीकरणाच्या विरोधात जोरदार आवाज उठवत अत्यंत गंभीर आरोप केले. हाफकीनला अनेक दशकांपूर्वी जागतिक आरोग्य संस्थेमार्फत विविध देशांकडून कल्चर मिळाले होते. या कल्चरच्या बाटल्या शीतगृहात कडीकुलपात ठेवल्या आहेत. एका कल्चरच्या बाटलीतील जिवंत जीवाणू वापरुन त्याच्या अनेक बाटल्या तयार करतात आणि मग त्या बाटल्यातून जीवाणू वापरून लाखो लसी तयार होतात. सुरक्षेच्या दृष्टीने हाफकीनकडे कल्चरच्या बाटल्या आहेत हे आजवर कधीही उघड करण्यात आले नव्हते. उच्च अधिकारी सोडून हाफकीनच्या कर्मचाऱ्यांनाही हे माहीत नव्हते. असे असताना गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात हे कल्चर विकण्याचा प्रस्ताव हाफकीनच्या बोर्ड मिटिंगमध्ये ठेवण्यात आला. हा प्रस्ताव फेटाळला गेला. पण प्रस्ताव आला याचाच अर्थ हे कल्चर खासगी कंपनीला विकण्याच्या हालचाली सुरू आहेत. किंबहुना हे कल्चर ३ हजार रुपयांना विकले गेले आहे असे आमदार रईस शेख हे विधासभेत म्हणाले. हे कल्चर जर खासगी उद्योगाला दिले तर त्यातून लसनिर्मिती होईल आणि ती लस महागडी असणार आहे. ज्योती गायकवाड, दिलीप वळसे-पाटील, अजय चौधरी, योगेश सागर, विजय वडेट्टीवार या सर्व आमदारांनी हाफकीनच्या खासगीकरणाला विरोध केला. खासगी कंपनीशी भागीदारी करू नका, हाफकीनला आर्थिक मदत करा, अशी मागणी या सर्व आमदारांनी केली. मात्र सरकारला हाफकीनचे खासगीकरण करायचेच आहे. म्हणून नरहरी झिरवळ प्रत्येक प्रश्नाला उत्तर देताना म्हणत होते की, हाफकीन तोट्यात असल्याने खासगी भागीदारी करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

# राममंदिर प्रकरणी प्रियांका गांधींचा जबाब नोंदवा! विहिंपची मागणी

पान १ वरून

यांनी राम मंदिरातील देणग्यांमध्ये २० हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप केला होता. तसेच या प्रकरणात ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि इतर प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला होता. आम आदमी पक्षाचे राज्यसभा सदस्य संजय सिंह यांनीही दानपेट्यांमधून २०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम चोरीला गेल्याचा आरोप केला होता. मात्र, त्यांनी यापूर्वी एसआयटीसमोर सादर केलेली कागदपत्रे वेगळ्या जमीन खरेदी प्रकरणाशी संबंधित असल्याचे विहिंपने स्पष्ट केले आहे. प्रियांका गांधी वाड्रा यांनीही एवढ्या मोठ्या गैरव्यवहारात केवळ कनिष्ठ कर्मचारीच सहभागी असू शकतात का, असा सवाल उपस्थित केला होता. या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून त्यांना पुरावे असल्यास तपासात त्याचा उपयोग करावा. मात्र, आरोप बिनबुडाचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विहिंपने केली आहे. दरम्यान, या वादाच्या पार्श्वभूमीवर विहिंपने १८ आणि १९ जुलै रोजी होणारी केंद्रीय व्यवस्थापन समितीची बैठक अयोध्येऐवजी नवी दिल्लीत घेण्याचा निर्णय घेतला आहे.




नवाकाळ
• मुंबई । सोमवार ६ जुलै, २०२६ • पान -८

## भारताच्या परिषदेत ८०० चिनी उद्योजक

**हांगझोऊ -** चीनमधील हांगझोऊ शहरात आयोजित 'भारत व्यवसाय परिषदेत' ८०० हून अधिक चिनी उद्योजक, गुंतवणूकदार आणि पर्यटन व्यावसायिकांनी सहभाग घेतला. भारतीय वाणिज्य दूतावासाने आयोजित केलेल्या या परिषदेचा मुख्य उद्देश व्यापार, तंत्रज्ञान आणि पर्यटन या क्षेत्रांतील गुंतवणुकीच्या संधी शोधणे हा होता. 'विकसित भारत २०४७' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांवर भर देण्यात आला. परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), पुरवठा साखळी, नवोन्मेष आणि व्यापारवृद्धी या विषयांवर सखोल चर्चा झाली. भारताने अलीकडेच थेट परकीय गुंतवणुकीच्या नियमांमध्ये केलेल्या बदलांमुळे चीनमधील व्यावसायिक वर्गात भारताविषयी उत्सुकता वाढली आहे.

# लेडीज डब्यात काका

**ट्रेनने दादर सोडलं, हे काका लेडीज डब्यात चढले. डोळे डबडबलेले, चेहरा त्रासलेला. प्रचंड थकवा. एरवी असं कुणी चढलं की, बायकांचा गलका सुरू होतो, उतरो-उतरोचा त्रागाही...पण या भल्या माणसाकडे पाहून सगळ्याजणी एकमेकींकडे पाहायला लागल्या.**

**खिडकीतून** बाहेर एकटक पाहत होते. डोळ्यातून येणारं पाणी बिल्कुल लपवायचा प्रयत्न नव्हता. काय झालं, विचारल्यावर ते म्हणाले, केईएममध्ये हिला अॅडमिट केलंय अन् टाटामध्ये मोठ्या सुनेचे काही रिपोर्ट्स दिलेत. दोघींना होणारा त्रास पाहून सकाळपासून कसतरी होतंय, पण घरातला कर्ता पुरुष. मला कुणाला सांगता येत नाही. खरं तर रडायचं होतं मोकळेपणाने. म्हणून ठरवून लेडीज डब्यात चढलो. काहीजणींनी बॅगेतलं चॉकलेट दिलं, पाणी दिलं. काका सावरले. म्हणाले, आपल्यात पुरुष रडत नाही, त्याने रडायचं नसतं. मन असतंच की आम्हालाही. आमच्या मागे भक्कम उभ्या राहणाऱ्या त्या दोघींनाही होणारा त्रास पाहून डिस्टर्ब झालोय खूप.



लेडीजमध्ये चढलो म्हटल्यावर तुम्ही आरडाओरडा कराल, असा विचारही आला नाही. खरंच. उलट तुम्ही सगळ्याजणी विचारपूस करतायत...थॅंक्स. भायखळ्याला काका उतरून निघून गेले.

मला किरण येलेंची सुरमई कविता आठवत राहिली. सुरमईची फक्त चव माहित्येय, सुरमई नाही जे सुरमईच्या बाबतीत, तेच अगदी बाईच्याही बाबतीत..

सुरमईला जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे काका भेटले. काका अप्रत्यक्षपणे सांगून गेले मला, मुलग्याला वाढवताना जरूर सांग, पुरुषानेही मोकळेपणाने रडायचं असतं. हक्काने मैत्रिणीच्या खांद्यावर डोकं ठेवून मनातलं सांगायचं असतं. तुझ्यासाठी तो असेलच पण तीही आहे, तितकीच खंबीर, समजून घेणारी याचीही याद ठेवायची असतेच. सगळ्यांसाठी कायम खंबीर असलेल्या तिचं जगणंही समजून घ्यायचं असतं..! तिचं, त्याचं, त्यांचं असं 'आपलं' नवं जग शक्य आहे!

**प्रणाली हळणकर**

## आजपासून औषध पुरवठादारांचे बेमुदत उपोषण आंदोलन

■ मुंबई

**ऑल** फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर्स फाऊंडेशन अर्थात अन्न आणि औषध परवानाधारक संस्थेने इशारा दिला आहे की, महाराष्ट्र मेडिकल गुड्स प्रोक्यूरमेंट अॅथॉरिटीकडून प्रदीर्घ काळापासून थकीत असलेल्या देयकांच्या निषेधार्थ राज्यभरातील वैद्यकीय पुरवठादार उद्या सोमवार ६ जुलैपासून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाबाहेर बेमुदत उपोषण आंदोलन करणार आहेत.

गेल्या वर्षभरापासून देयके प्रलंबित असल्याने पुरवठादार गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना वैधानिक जबाबदाऱ्या, कर्मचाऱ्यांचे पगार, बँकिंगची देणी आणि उत्पादक व वाहतूकदारांना देयके देण्यास गंभीर अडचणी येत आहेत. याबाबत अनेक लेखी निवेदने, वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठका आणि या विषयावर वारंवार पाठपुरावा केला. परंतु अद्याप सकारात्मक प्रतिसाद दिसून आलेला नाही. त्यामुळे हा बेमुदत उपोषण आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागत आहे, असे अन्न आणि औषध परवानाधारक संस्थेने महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

## उद्धव ठाकरेंनी बोलावली आमदारांची बैठक! मंगळवारी मातोश्रीवर खलबते

■ मुंबई

**उबाठा** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या सर्व आमदारांची बैठक मंगळवारी सायंकाळी ७ वाजता मातोश्री येथे बोलावली आहे. पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा आठवडा, विधिमंडळातील आमदारांची कामगिरी आणि सध्याच्या राजकीय घडामोडींची ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

गेल्या काही दिवसांत राज्याच्या राजकारणात वेगवान घडामोडी घडल्या आहेत. शिंदे गटाचे काही महत्त्वाच्या राजकीय हालचाली झाल्यानंतर उबाठातही विविध चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः लोकसभेतील काही



खासदारांच्या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी पक्ष संघटना व विधिमंडळातील रणनीतीबाबत आमदारांशी संवाद साधण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. यापूर्वीही उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली होती. काही आमदार विविध कारणांमुळे त्या बैठकीला उपस्थित राहू शकले नव्हते. आता पावसाळी अधिवेशनाच्या अंतिम टप्प्यात पुन्हा एकदा सर्व आमदारांना एकत्र बोलावण्यात आले आहे. या बैठकीत आमदारांचा विधिमंडळातील परफॉर्मन्स, आगामी राजकीय रणनीती, मतदारसंघनिहाय कामकाज तसेच सध्याच्या राजकीय घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

## विशेष विवाह अधिकारी पद भरण्याची ख्रिश्चन समाजाची सरकारकडे मागणी

■ मुंबई

**विशेष** विवाह अधिकारी यांचे पद अनेक महिन्यांपासून रिक्त असल्याने विशेष विवाह अधिनियम, १९५४ अंतर्गत विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत, ख्रिश्चन समाजाने महाराष्ट्र सरकारकडे मुंबईत तातडीने विशेष विवाह अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

वॉचडॉग फाऊंडेशनचे विश्वस्त निकोलस आल्मेडा आणि अॅड. गॉडफ्रे पिमेंटा यांनी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव व आयुक्त यांना निवेदन दिले असून, त्याची प्रत मुख्यमंत्री यांनाही पाठवली आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, विशेष विवाह अधिकारी पद दीर्घकाळ रिक्त असल्यामुळे मुंबईतील विशेष विवाह अधिनियमांतर्गत विवाहांचे विधिवत संपन्नीकरण आणि नोंदणीची प्रक्रिया जवळपास ठप्प झाली आहे. फाऊंडेशनच्या मते, विशेष विवाह अधिनियमाचा वापर प्रामुख्याने आंतरधर्मीय विवाह करणारी जोडपी करतात. मात्र अनेक ख्रिश्चन जोडपीही वैयक्तिक, कायदेशीर आणि इतर वैध कारणांमुळे धार्मिक वैयक्तिक कायद्याऐवजी धर्मनिरपेक्ष कायदेशीर चौकटीत विवाह करण्याचा पर्याय निवडतात. ख्रिश्चन जोडपी नोंदणीकृत विवाहानंतर चर्चमध्ये धार्मिक विवाहसोहळा करतात. पूर्वी ही पद्धत प्रचलित नव्हती, असे अॅड. गॉडफ्रे पिमेंटा यांनी सांगितले.

## ई-२० इंधन धोरणाचा फेरविचार नाही पत्रकार परिषदेत केंद्राची ठाम भूमिका

■ नवी दिल्ली

**इथेनॉलमिश्रीत** पेट्रोलच्या ई-२० (२० टक्के इथेनॉल आणि ८० टक्के पेट्रोल) धोरणावरून समाज माध्यमांमधून सुरू असलेल्या उलटसुलट वृत्तांवर नुकतेच केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण दिले. इथेनॉलमिश्रित पेट्रोलबाबत समाज माध्यमांवर केले जाणारे दावे दिशाभूल करणारे असून ई-२० धोरणावर फेरविचार करण्याची गरज नाही, असे पुरी यांनी सांगितले.

ई-२० धोरण मागे घेण्याचा किंवा हे धोरण मागे घेण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या सरकारच्या विचाराधीन नाही. सोशल मीडिया आणि काही माध्यमांमध्ये यासंबंधी केले जात असलेले दावे दिशाभूल करणारे आहेत. ई-२० इंधनामुळे वाहनाचे इंजिन खराब होते, असे एकही उदाहरण समोर आलेले नाही. त्यामुळे हे धोरण मागे घेण्याची गरज नाही, असे पुरी यांनी सांगितले. मात्र ई-२० इंधनामुळे वाहनांच्या मायलेजमध्ये किरकोळ घट होऊ शकते, अशी कबुली पुरी यांनी यावेळी दिली. कच्च्या तेलासाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, परकीय चलनाची बचत करणे, इथेनॉल उत्पादनामुळे शेतकऱ्यांना अधिकचा फायदा करून देणे आणि कार्बन उत्सर्जन कमी करून स्वच्छ ऊर्जा वापराला चालना देणे ही ई-२० धोरणाची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत, असे पुरी यांनी पुन्हा एकदा सांगितले.

## २०१९ मध्ये आदित्य ठाकरेंसाठी पक्ष बदलला! सचिन अहिरांच्या मुलीचा दावा

■ मुंबई

**उबाठाला** सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसेनेत प्रवेश केलेले आमदार सचिन अहिर यांच्या पक्षांतरावरून राजकीय वातावरण तापले असतानाच, त्यांची मुलगी किरण अहिरने एक भावनिक व्हिडिओ शेअर करत वडिलांची भूमिका मांडली. माझ्या वडिलांनी २०१९ मध्ये आदित्य ठाकरेंसाठी पक्ष बदलला आणि त्यानंतर पूर्ण निष्ठेने काम केले, असा दावा तिने केला. या व्हिडिओची चर्चा सुरू आहे.

किरण अहिरने म्हटले की, काही दिवसांत समाजमाध्यमावर माझ्या वडिलांविषयी अनेक आरोप, टीका आणि द्वेषपूर्ण



संदेश पाहायला मिळत आहेत. आज मी येथे कोणाशी वाद घालण्यासाठी किंवा कोणाच्या विरोधात बोलण्यासाठी आलेली नाही. मी फक्त एक मुलगी म्हणून, लहानपणापासून जवळून पाहिलेल्या माझ्या वडिलांविषयीचा माझा दृष्टिकोन मांडण्यासाठी बोलत आहे. सर्वाधिक विचारला जाणारा

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

प्रश्न म्हणजे, इतके सगळे मिळाले असताना त्यांनी पक्ष का बदलला? या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी, मला वाटते की, आपण एक महत्त्वाची गोष्ट समजून घेतली पाहिजे.

## खोमेनींच्या अंत्यविधीदरम्यान ३ हजार जणांचा मृत्यू होण्याचे भय

■ तेहरान

**इराणचे** सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला अली खोमेनी अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात तीन महिन्यांपूर्वी मारले गेले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करणे हा तमाम इराणी नागरिकांसाठी सर्वात मोठा दुःखदायक विधी आहे. खोमेनींच्या पार्थिवावरील अंत्यसंस्कार हा आठवडाभर चालणारा राष्ट्रीय कार्यक्रम आहे ज्याची सुरुवात झाली आहे. लाखो इराणी नागरिक आपल्या सर्वोच्च धार्मिक नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी रस्त्यावर उतरत आहेत. इराणमध्ये सध्या तीव्र उन्हाळा सुरू आहे. अंत्यसंस्काराला होणारी प्रचंड गर्दी आणि भीषण उष्णतेमुळे या आठवडाभरात तब्बल ३ हजार लोक मृत्यूमुखी पडतील असा अंदाज सरकारने व्यक्त केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे अंत्यसंस्कारादरम्यान मरण पावणाऱ्या लोकांच्या पार्थिवावर दफनविधी करण्यासाठी सरकार पातळीवर कबरी खोदण्याचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

## जालन्यात प्रथमच संत मुक्ताई पालखीचा रिंगण सोहळा

■ जालना

**संत** मुक्ताई पालखी सोहळ्यातील ऐतिहासिक रिंगण सोहळा आज प्रथमच जालना शहरात पार पडला. ३१८ वर्षांची परंपरा असलेल्या या सोहळ्याला राज्यभरातून आलेल्या हजारो वारकऱ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावत भक्तिभावाने सहभाग नोंदविला.



हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि अभंगांच्या सुरांनी परिसर भक्तिमय झाला होता. या सोहळ्यात विविध दिंड्या, फडकरी, महिला वारकरी आणि युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, हरिपाठ, अखंड नामस्मरण आणि टाळ-मृदुंगाच्या गजरामुळे भक्तिमय वातावरण झाले होते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सुरक्षा व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. जालन्यात प्रथमच पार पडलेला हा रिंगण सोहळा वारकरी संप्रदायासाठी ऐतिहासिक ठरला असून, भाविकांनी मोठ्या उत्साहात त्याचा आनंद घेतला.

## धारगळ टोलनाका तोडफोड प्रकरण नितेश राणेंविरोधात अजामीनपात्र वॉरंट

■ मुंबई

**मत्स्यव्यवसाय** आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या विरोधात गोव्यातील म्हापसा न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. २०१३ मधील धारगळ-पेडणे टोलनाका तोडफोड आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याच्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे.

सुनावणीदरम्यान इतर आरोपी न्यायालयात हजर होते. नितेश राणे गैरहजर राहिल्याने न्यायालयाने त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी सोमवारी होणार असून, त्यावेळी राणे न्यायालयात हजर राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे प्रकरण २०१३ मधील असून, नितेश राणे आपल्या सहकाऱ्यांसह सिंधुदुर्ग-गोवा मार्गावरून प्रवास करत असताना धारगळ येथील टोल नाक्यावर टोल भरण्यावरून कर्मचाऱ्यांशी वाद झाल्याचा आरोप आहे. या वादानंतर टोलनाक्याची तोडफोड, कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

## काँग्रेसचे आ. लिंगाडे यांना २० कोटींची ऑफर! खा. संजय राऊत यांचा दावा

■ मुंबई

**राज्यात** आमदार-खासदार फोडाफोडीचे राजकारण सुरूच असताना, आता काँग्रेसचे विधान परिषदेतील आमदार धीरज लिंगाडे यांना २० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आल्याचा दावा उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

संजय राऊत म्हणाले की, सध्या अधिवेशन सुरू असून, विरोधकांना पक्षबदलासाठी रोज ऑफर दिल्या जात असल्याच्या चर्चा आहेत. मात्र, माणसाला किती हव्यास असावा? ज्याला कुठे थांबायचे हे कळत नाही, त्याचा अंत निश्चित



असतो. पक्ष फोडणारे हे सरकार लवकरच कोसळेल. राम आणि कृष्णही या पृथ्वीवर आले आणि गेले. मग मोदी, शहा, फडणवीस किंवा शिंदे हे काय अमर आहेत का? प्रत्येकाला एक दिवस जावेच लागते. सत्ता, पैसा आणि यंत्रणेच्या बळावर आमदार-खासदार फोडण्याचे घाणेरडे राजकारण सुरू आहे. काँग्रेसचे परिषदेतील आमदार धीरज लिंगाडे यांना २० कोटी रुपयांची ऑफर आणि आगामी निवडणुकीत उमेदवारीचे आश्वासन दिले आहे. तुम्ही आमदार आणि खासदार फोडत आहात, कार्यकर्ते फोडत आहात, पैसे देत आहात. मग इस्पितळात जाऊन स्ट्रेससाठी दाखल व्हावे लागते. किती पाहिजे तुम्हाला? हे सगळं थांबवले पाहिजे.

## येवल्यात शिंदेंच्या ७ नगरसेवकांचा राष्ट्रवादी-भाजपा युतीला पाठिंबा

■ नाशिक

**येवला** नगरपालिकेत शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाच्या १० पैकी तब्बल ७ नगरसेवकांनी अजित पवार गट आणि भाजपा युतीला पाठिंबा जाहीर केला आहे. या घडामोडीमुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे.

सर्व ७ नगरसेवकांनी माजी खासदार समीर भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली, राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या संपर्क कार्यालयात बैठक घेतल्यानंतर हा निर्णय जाहीर केला. या नगरसेवकांनी शिक्षक आमदार किशोर दराडे आणि शिवसेना नेते कुणाल दराडे यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत हा निर्णय घेतल्याचे सांगितले. समीर भुजबळ म्हणाले की, राज्यात महायुतीचे घटक पक्ष एकत्र असले तरी स्थानिक पातळीवर मतभेद असू शकतात. मात्र, शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

दरम्यान, नगरसेवकांना सातत्याने त्रास दिला जात होता. यापुढेही तसाच प्रकार सुरू राहिल्यास हे सातही नगरसेवक राजीनामा देऊन निवडणुकीला सामोरे जातील, असा इशारा शिंदे गटाच्या उपजिल्हाध्यक्षांनी दिला. या निर्णयामुळे येवला नगरपालिकेतील राजकीय समीकरणे बदलली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड महत्त्वाची मानली जात आहे.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात मानवी साखळी आंदोलन

■ ठाणे

**संजय** गांधी राष्ट्रीय उद्यान वाचवण्यासाठी ठाण्यात आज पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी भव्य मानवी साखळी आंदोलन केले. 'सेव्ह एसजीएनपी' मोहिमेअंतर्गत मानपाडा ते खेवरा सर्कलदरम्यान सुमारे दीड ते दोन किलोमीटर लांबीची मानवी साखळी रचत शेकडो नागरिकांनी शांततापूर्ण आंदोलनात सहभाग घेतला.

उद्यानातील १९३ एकर जमीन वनक्षेत्र म्हणून तातडीने संरक्षित करावी, ही आंदोलकांची मुख्य मागणी आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने विकास आराखड्यातील सुमारे १०० एकर जमिनीवरील आरक्षणे रद्द करावीत आणि वनसंपदेला धोका निर्माण करणारा ४० मीटर पायथ्याचा रस्ता प्रस्ताव मागे घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. या आंदोलनात पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. 'जंगल वाचवा', 'राष्ट्रीय उद्यानाचे संरक्षण करा'



अशा घोषणा दिल्या. उद्यानातील जैवविविधतेवर होणाऱ्या परिणामाबाबत आंदोलनकर्त्यांनी चिंता व्यक्त केली.

## दगड मारणे विसरलेलो नाही! पुणे शिवसैनिक-उद्धव ठाकरे भेट

■ मुंबई

**उबाठात** सुरू असलेल्या पडझडीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील ज्येष्ठ शिवसैनिकांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची 'मातोश्री'वर भेट घेतली. या भेटीत पुणे शहरप्रमुख वसंत मोरे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांशी मनमोकळा संवाद साधत संघटनेच्या स्थितीवर चर्चा केली. यावेळी शिवसैनिकांनी उद्धव ठाकरेंना 'साहेब आदेश द्या, आम्ही दगड मारणे सोडले आहे, पण विसरलो नाही, असे सांगितले. भेटीनंतर वसंत मोरे म्हणाले की, शिवसैनिक पहिल्यांदाच एवढा वेळ उद्धव साहेबांसमोर बसले व त्यांनी अतिशय मनमोकळेपणाने संवाद साधला. सगळ्यांसोबत गप्पा मारल्या, काही जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. एक तास ही बैठक चालली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आम्हाला आदेश दिला की, शाखा-शाखांमध्ये जाऊन काम करा. सध्याच्या राजकीय परिस्थितीबाबत, संघटनेत सुरू असलेल्या फुटीबाबत चर्चा झाली.

## ही वेळ दुसऱ्या पालकांवर येऊ नये रियाच्या वडिलांची जंतरमंतरवरून हाक

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकार, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांची अंमलबजावणी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतर येथे कॉकरोच जनता पार्टीच्या सुरू असलेल्या आंदोलनाचा आज १६ वा दिवस होता. डेहराडून येथील आत्महत्या केलेली नीट परीक्षार्थी रिया कुमारी थापा हिचे वडील आज आंदोलनस्थळी उपस्थित होते. माझ्यासारखी वेळ दुसऱ्या कोणत्याही आई-वडिलांवर येऊ नये, एवढीच माझी इच्छा आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. तर १६ व्या दिवशीही कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थकांनी जंतर-मंतर खचाखच भरलेले होते.

रियाचे वडील भारतीय लष्करातून निवृत्त झाले आहेत, ते म्हणाले की, मी इथे यासाठी आलो आहे की, माझी मुलगी रियासोबत जे घडले, ते पुन्हा कोणत्याही मुला-मुलीसोबत घडू नये. सरकारला कदाचित याचे काही वाटत नसेल, पण माझ्यासारखी वेळ पुन्हा कोणत्याही आई-वडिलांवर येऊ नये, एवढीच माझी इच्छा आहे.

याशिवाय या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज आठवा दिवस असून, त्यांचे ६ किलो वजन कमी झाले असून, त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती आहे.